पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९६ ■ गुरूवार, दि. २२ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 /49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# अकोल्याच्या प्रथम नागरिक ओबीसी महिला होणार !



प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला:** अकोला महापालिकेच्या महापौर पदाचे आरक्षण आज घोषित झाले. या आरक्षणात ओबीसी महिला प्रवर्गातील उमेदवाराला महापौर पद मिळणार आहे. स्थायी समिती अकोला पुर्व मध्ये राहणार असल्याने महापौर पद हे अकोला पश्चिम मध्ये देण्याचा कल भाजपा चा राहिल. हे करताना भाजप अकोला पश्चिम मध्ये असलेल्या वैशाली शेळके किंवा शारदा खेडकर यांना महापौर पदावर विराजमान करु शकतात. त्याच बरोबर इतर ही भाजपच्या नगरसेविका या महापौर पदाच्या प्रमुख दावेदार आहे. यात प्रामुख्याने रश्मी अवचार, यांच्यासह योगिता पावसाळे, सोनाली अंधारे, कल्पना गोटफोडे, प्राची काकड, निकिता देशमुख, शिल्पा वरोकार यांच्या नावांची प्रामुख्याने चर्चा रंगली आहे.

महापालिकेत अनुभवी असलेल्या महिलेस हे पद दिले जाईल. ओबीसी महिला प्रवर्गातून निवडून आलेल्या महिलेला महापौर केले जाईल. अकोला महापालिकेत भाजपचा महापौर होणार असून नेमके कोणाला महापौर पदाची संधी पक्ष देते असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. एकाच घरात वारंवार पदे दिले जातील काय असा ही प्रश्न या निमित्त विचारला जात आहे. गेल्या काही वर्षात ज्यांना वारंवार पदे दिले गेले त्यांना तर पद दिले जाणार नाही ना असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर आता सर्वांचेच लक्ष लागून असलेल्या महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत आज मंत्रालयात जाहीर झाली नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत ही सोडत प्रक्रिया पार पडली. या सोडतीत अकोला महानगरपालिकेचे महापौर पद नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला अर्थात ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आला आहे. अकोला महापालिकेत भाजपाला सर्वाधिक ३८ जागा मिळाल्या आहेत त्या खालोखाल काँग्रेसला २१ जागा मिळाल्या आहेत त्यामुळे भाजप किंवा काँग्रेस या दोघांपैकी एकाचा महापौर बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यातल्या त्यात भाजपाचे संख्याबळ जास्त असल्याने यंदा भाजपाचा महापौर होणार असे दिसून येत आहे. भाजपाकडे योगिता पावसाळे, ॲड. कल्पना संजय गोटफोड़े, प्राची काकड, शारदा खेडकर, मंजुषा शेळके, नीतू जगताप, रश्मी अवचार आदी ओबीसी महिला उमेदवार आहेत. २००२ ते २०१७ या १७ वर्षांच्या कालावधीत एकूण आठ महापौरांपैकी तब्बल पाच महिला महापौर पदी विराजमान झाल्या. तर पुरुषांना केवळ तीन तास महापौरपदाची संधी मिळाली यावर्षीच्या निवडणुकीत भाजप सर्वाधिक जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे त्यामुळे भाजपाचा महापौर होणार हे आता जवळपास निश्चित झाले आहे. त्यामुळे पक्षातील या महिला दिग्गजांना महापौर पदाचे वेध लागले आहेत, आज मंत्रालयात निघालेल्या सोडतील ओबीसी महिला प्रवर्गाला महापौर पद मिळणे निश्चित झाले

> शहराचा प्रथम नागरिक म्हणजे महापौर होण्याची संधी फार कमी नगरसेवकांना मिळते. नियमानुसार महापौर पदाचा कार्यकाल अडीच वर्ष असतो. शहरात मागील वीस वर्षाच्या कालावधीत सुमन ताई गावंडे, अश्विनी हातवळणे, मदन भरगड, सुरेश पाटील ,ज्योत्स्ना गवई, उज्वला देशमुख, विजय अग्रवाल आणि अर्चना मसने यांना महापौर पदाची संधी मिळाली आहे. आतापर्यंत पाच महिला महापौर बांधल्यानंतर सहाव्यांदा सुद्धा महिला नगरसेविका महापौर बनणार आहे. भाजपाला बहुमतासाठी ४१ नगरसेवक आवश्यक आहेत भाजपकडे ३८ आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्ष आणि महानगर विकास समितीचा एक असे ४० नगरसेवक आहेत. बहुमतासाठी भाजपला शिंदे सेना अपक्ष किंवा इतर काही नगरसेवकांची मदत घ्यावी लागणार आहे. महापौर पदाचे आरक्षण ओबीसी महिलांसाठी निघाल्याने वरील भाजपाच्या ओबीसी महिलांमधून कोण महापौर होईल याबाबत सर्वांना उत्सुकता लागून राहिली आहे .

> ८० सदस्यांच्या सभागृहात ४१ नगरसेवकांचे संख्याबळ मिळाल्यास साधे बहुमत होणार आहे. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व तीन पक्ष नेता ही महत्त्वाची पदे मिळवण्यासाठी भारतीय जनता पक्षाकडून जोरदार रणनीती आखली जात आहे. तसेच भाजपचे संख्याबळ बहुमताच्या आकड्याच्या अगदी जवळ असल्याने त्या पक्षासोबत जाण्यास राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) उद्धवसेनेच्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# मुंबईसह 16 ठिकाणी महिला महापौर

प्रतिनिधी २२ जानेवारी

**मुंबई :** महापालिकेतील सत्तास्थापनेतील पहिला आणि महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या महापौरपदाच्या आरक्षणासाठी आज, गुरुवारी मंत्रालयात सोडत काढण्यात आली. महापौरपदाच्या पहिल्या अडीच वर्षांच्या कालावधीसाठी ही सोडत आहे. आरक्षणात स्पष्टता आल्यानंतर महापालिकेतील सत्तास्थापनेच्या घडामोडींना वेग आला आहे. सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या मुंबई महापौरपद महिलांसाठी आरक्षित झाले आहे. याव्यतिरिक्त इतर १५ ठिकाणेच आरक्षण महिलांसाठी निघाल्याने महिलाराज येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

नगरविकास खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळयांच्या अध्यक्षतेखाली आज गुरुवारी सकाळी १२ वाजता मंत्रालयातील परिषद सभागृहात महापौरपदाची आरक्षण सोडत निघाली आहे. या सोडतीत कोणत्या महापालिकेत कोणत्या प्रवर्गातील महापौरपद आरक्षित झाले आणि कोणत्या महापालिकेत खुल्या प्रवर्गातील महापौर असेल, हे स्पष्ट झालं आहे. दरम्यान, आज सोडत जाहीर झाल्यानंतर आता, महापालिकांमध्ये महापौरपदी कुणाची वर्णी लागेल? हे पाहणं देखील महत्त्वाचं असणार आहे.

**सर्वसाधारण (ओपन)** - मुंबई, नवी मुंबई, मिरा भाइंदर, भिवंडी निजामपूर, नाशिक, मालेगाव, धुळे, वसई विरार, नागपूर, अमरावती, पुणे, पिंपरी चिंचवड, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि नांदेड

**नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी)** - अकोला, अहिल्यानगर, जळगाव, चंद्रपूर, उल्हासनगर, पनवेल, कोल्हापूर, इचलकरंजी

**अनुसूचित जाती (एससी)** - जालना, लातूर, ठाणे

**असुनसूचित जमाती (एसटी)** - कल्याण डोंबिवली

## महिलांसाठी महापौर असलेले जिल्हे

मुंबई, नवी मुंबई, मिरा भाइंदर, भिवंडी निजामपूर, नाशिक, मालेगाव, धुळे, पुणे, पिंपरी चिंचवड, नांदेड, अकोला, अहिल्यानगर, जळगाव, चंद्रपूर, जालना, लातूर.

# हवामानाचा लहरीपणा; दिवसा उकाडा रात्री हुडहुडी!

प्रतिनिधी २२ जानेवारी

**पुणे :** शहरासह उपनगरांमध्ये सध्या हवामानाचा लहरीपणा पाहायला मिळत आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पुणेकर विचित्र हवामानाला सामोरे जात असून, दिवसा कडक ऊन आणि रात्री गारवा असं परस्परविरोधी वातावरण निर्माण झालं आहे. हवेली तालुक्यात तापमानाचा पारा सर्वाधिक खाली आला असून, येथे १०.९ अंश सेल्सिअस इतक्या नीचांकी तापमानाची नोंद झाली आहे.

# अकोला जि.प., पं.स. साठी आणखी करावी लागणार प्रतीक्षा!

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला :** आधीच अडीच वर्षांपेक्षा जास्त प्रशासक राज असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका कधी होणार याची प्रतीक्षा इच्छुकांसह सर्वसामान्य नागरिकांनाही लागून होत्या. मात्र २१ जानेवारीच्या सुनावणीत २३ फेब्रुवारीची पुढील तारीख मिळाल्यामुळे १५ फेब्रुवारीला निवडणुका होतील, ही आशा मावळली आहे. त्यामुळे सर्वांनाच आता प्रतीक्षा करावी लागणार आहे. यामुळे गुडघ्याला बाशिंग बांधून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांचा चांगलाच हिरमोड झाला असून, त्यांची घालमेल वाढत आहे. अकोला जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये ओबीसी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्यात आल्यामुळे पहिल्या टप्प्यात निवडणूक होऊ शकली नाही. अशा जि.प. आणि पं.स.साठी २१ जानेवारीला सुप्रीम कोर्टात सुनावणी ठेवण्यात आली होती.

# प्रजासत्ताक दिनी मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट!

## राम मंदिर, दिल्ली टार्गेटवर; यंत्रणा हायअलर्ट



वृत्तसंस्था २२ जानेवारी

**दिल्ली :** भारताच्या विविध शहरांमध्ये प्रजासत्ताक दिनी मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा इशारा देण्यात आला आहे. गुप्तचर यंत्रणांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीसह देशातील मोठी मंदिरं दहशतवाद्यांच्या निशाण्यावर आहेत. या पार्श्वभूमीवर दिल्लीसह सर्व महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयने या हल्ल्यासाठी एक गुप्त योजना तयार केली असून, त्याला 'कोड नेम २६-२६' असं नाव देण्यात आलं आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, अयोध्येचं राम मंदिर आणि जम्मूचं रघुनाथ मंदिर दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर आहेत. सुरक्षा यंत्रणांकडून इनपुट मिळाल्यानंतर सुरक्षा दलांना अधिक सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राजधानी दिल्लीतही कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. 'जैश-ए-मोहम्मद' ही दहशतवादी संघटना आणि पंजाबमधील गँगस्टर्सच्या मदतीने हा हल्ला घडवून आणला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. गुप्तचर यंत्रणा सोशल मीडियावर सतत लक्ष ठेवून आहेत. 'काश्मिरी रेसिस्टन्स ग्रुप' आणि 'फाल्कन स्क्वॉड' यांसारख्या संघटनांकडून चिथावणीखोर धमक्या दिल्या जात आहेत. प्रजासत्ताक दिनाची सुरक्षा लक्षात घेता दिल्लीत दहशतवाद्यांचे पोस्टर्स लावण्यात आले आहेत. यामध्ये पहिल्यांदाच दिल्लीतील एका दहशतवाद्याचा फोटो लावण्यात आला आहे. मोहम्मद रेहान असे या दहशतवाद्याचे नाव असून तो ईशान्य दिल्लीतील रहिवासी असल्याचे समजते. संभल येथील अल-कायदा मॉड्यूलचा पर्दाफाश झाल्यानंतर हा दहशतवादी फरार झाला होता. सुरक्षा यंत्रणांनी सैयद मोहम्मद अर्शिया, मोहम्मद रेहान, मोहम्मद शरजील अख्तर, मोहम्मद उमर, अबू सुफियान आणि मोहम्मद शहीद फैजल अशा काही प्रमुख दहशतवाद्यांची ओळख पटवली आहे.

### जम्मू-काश्मीरमध्ये शोधमोहीम

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर जम्मूत सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. रोहिंग्या मुस्लिमांची मोठी लोकसंख्या असलेल्या भागात बुधवारी शोधमोहीम राबवण्यात आली. तसेच किश्तवाड जिल्ह्याच्या डोंगराळ भागात लष्कराची अतिरिक्त कुमक तैनात करण्यात आली आहे. सीमावर्ती भाग आणि महामार्गांवर कडेकोट नाकाबंदी करण्यात आली असून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार टाळण्यासाठी यंत्रणा सज्ज आहेत.

# अवकाशाला गवसणी घालणाऱ्या सुनीता विल्यम्स NASAमधून निवृत्त

वृत्तसंस्था २२ जानेवारी



**नवी दिल्ली :** अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था असलेल्या नासामधील प्रसिद्ध अंतराळवीर सुनीता विल्यम्स या २७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्या आहेत. भारतीय वंशाच्या अंतराळवीर असलेल्या सुनीता विल्यम्स यांची निवृत्ती २७ डिसेंबर २०२५ पासून लागू झाली आहे.

सुनीता विल्यम यांनी आपल्या दीर्घ कारकीर्दीमध्ये आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रावर तीन मोहिमा यशस्वीपणे पूर्ण करत अनेक विक्रम आपल्या नावावर नोंदवले.

सुनीता विल्यम्स यांच्या यशस्वी कारकीर्दीबाबत नासाने दिलेल्या माहितीनुसार सुनीता विल्यम्स यांनी एकूण ६०८ दिवस अंतराळात वास्तव्य केले आहे. नासाच्या कुठल्याही अंतराळवीराने अंतराळात वास्तव्य केलेला हा दुसरा सर्वाधिक कालावधी आहे. याशिवाय सुनिता विल्यम्स यांनी एकूण ९ वेळा स्पेसवॉक केला आहे. त्याचा एकूण कालावधी ६२ तास ६ मिनिटे एवढा आहे. कुठल्याही महिला अंतराळवीराने स्पेसवॉकमध्ये केलेला हा सर्वाधिक कालावधी आहे. तर एकूण स्पेसवॉकच्या यादीत सुनीता विल्यम्स चौथ्या क्रमांकावर आहेत.

सुनीता विल्यम्स या पहिल्यांदा डिसेंबर २००६ मध्ये अंतराळात गेल्या. त्यानंतर २०१२ मध्ये त्यांनी दुसऱ्यांदा अंतराळाकडे उड्डाण केलं होतं. तर २०२४ मध्ये त्या बोईल स्टारलायनर मोहिमेच्या माध्यमातून सुनीता विल्यम्स या अंतराळात गेल्या होत्या. या मोहिमेवेळी काही तांत्रिक अडथळ्यांमुळे त्यांचं अंतराळातील वास्तव्य वाढलं होतं. अखेरीस २०२५ मध्ये त्या पृथ्वीवर परतल्या होत्या.

# राज्यातील 4 महापालिकांवर महायुतीचीच सत्ता!

## विशेष बैठकीनंतर होणार महापौरांच्या नावावर शिक्कामोर्तब

प्रतिनिधी २२ जानेवारी

**मुंबई :** राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर आणि मुंबई या महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये महायुतीचा महापौर विराजमान होणार हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे. मात्र महापौरपदी कोण विराजमान होणार, शपथविधी कधी असणार, याची उत्सुकता सर्वांनाच लागून लागली आहे. महाराष्ट्रात महायुतीने जिंकलेल्या महापालिकेच्या महापौरांची घोषणा ही येत्या रविवारनंतरच होणार असल्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या दावोस दौऱ्यावर आहे. येत्या २५ जानेवारीला ते भारतात परणार आहेत. ते भारतात परतल्यानंतर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यात बैठक होणार आहे. या विशेष बैठकीत अंतिम शिक्कामोर्तब केले जाणार आहे. सुरुवातीला महापौरपदाच्या वाटपावरून भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात पेच निर्माण होण्याची चिन्हे होती.

### शिंदे गटाचे पारडे जड

कल्याण-डोंबिवलीमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांनी ५३ शिवसेना नगरसेवक आणि ५ मनसे नगरसेवक अशा एकूण ५८ जणांची युती घडवून आणली आहे. या गणितामुळे सत्तेत समान वाटा मागणाऱ्या भाजपवर दबाव वाढला असून शिंदे गटाचे पारडे जड झाले आहे. ठाणे महानगरपालिकेत शिवसेनेच्या ६७ पैकी ६६ नगरसेवकांनी शिंदे यांना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे ठाण्यात शिंदेसेनेचाच महापौर बसणार याची आता केवळ औपचारिकता उरली आहे. कल्याण-डोंबिवली व उल्हासनगर या दोन्ही शहरांमध्ये ५५ हून अधिक नगरसेवक शिंदे गटात सामील झाल्याने स्थानिक राजकारणाची सूत्रे पूर्णपणे महायुतीच्या हाती आली आहेत.

### मुंबईत एक उच्चस्तरीय बैठक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसवरून परतल्यानंतर मुंबईत एक उच्चस्तरीय बैठक पार पडणार आहे. या बैठकीत केवळ महापौरांच्या नावांवरच नव्हे, तर महायुतीमधील जागावाटप आणि सत्तेच्या समतोलावरही चर्चा होण्याची शक्यता आहे. महायुतीमधील समन्वय टिकवून ठेवण्यासाठी दोन्ही नेते कोणता सुवर्णमध्य काढतात, याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे.

# पेन्शनसाठी दीड वर्षांपासून वनवास!

## संतप्त पतीचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा



प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला :** पत्नीच्या निधनानंतर हक्काचे कुटुंब निवृत्ती वेतन आणि इतर लाभ मिळवण्यासाठी शासन दरबारी चपला झिजवूनही न्याय मिळत नसल्याने, एका हताश पतीने आता टोकाचे पाऊल उचलण्याचा इशारा दिला आहे. चंद्रशेखर वा. गौड असे या व्यक्तीचे नाव असून, त्यांनी अकोला जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. नेमक्या कुठल्या कारणांवरुन यांचे कुटुंब निवृत्ती वेतन थांबले असा प्रश्न उपस्थित होत आहे.

चंद्रशेखर गौड यांच्या पत्नी सौ. दुर्गा चंद्रशेखर गौड (माहेरचे नाव: कु. दुर्गा केशवराव बैतुले) या 'स्वामी विवेकानंद प्राथमिक मराठी शाळा, मलकापूर रोड, अकोला' येथे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. त्यांचे ३० एप्रिल २०२४ रोजी निधन झाले. पत्रात नमूद केल्यानुसार, पत्नीच्या निधनानंतर मिळणारे कुटुंब निवृत्ती वेतन आणि इतर आर्थिक लाभांसाठी चंद्रशेखर गौड हे मागील दीड वर्षांपासून सतत प्रयत्न करत आहेत. मात्र, शिक्षण विभाग आणि संबंधित शाळा प्रशासनाकडून त्यांना अद्याप कोणताही लाभ मिळालेला नाही.

दीड वर्षांपासून प्रशासनाचे उंबरठे झिजवूनही काम होत नसल्याने गौड यांची आर्थिक स्थिती खालावली आहे. 'माझे मानसिक संतुलन बिघडले असून मी सतत तणावात आहे,' असे त्यांनी पत्रात म्हटले आहे. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे कंटाळून त्यांनी आता स्वतःचे जीवन संपवण्याचा निर्णय घेतला आहे.'जर माझ्या जीवाचे काही बरे-वाईट झाले, तर त्याला प्राथमिक शिक्षणाधिकारी (जिल्हा परिषद, अकोला) आणि स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सर्वस्वी जबाबदार राहतील,' असा थेट आरोप गौड यांनी केला आहे. हे निवेदन २० जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग (प्राथमिक) आणि पोलीस अधीक्षक कार्यालयात सादर करण्यात आले आहे. या गंभीर इशाऱ्यानंतर आता प्रशासन खडबडून जागे होणार का आणि गौड यांना त्यांचा हक्क मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आता केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या चौकशीचे राज्य पोलिसांनाही अधिकार!

वृत्तसंस्था २२ जानेवारी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना तपासापासून मिळणारे 'संरक्षण' आता संपुष्टात आले आहे. एका अत्यंत महत्त्वपूर्ण निकालात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, केंद्र सरकारच्या कोणत्याही कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हेगारी प्रकरणाचा तपास करण्याचा पूर्ण अधिकार राज्य पोलिसांना आहे. यासाठी सीबीआय किंवा केंद्राच्या विशेष परवानगीची गरज नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

राजस्थानमधील एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने हा ऐतिहासिक निकाल दिला. केंद्र सरकारच्या एका कर्मचाऱ्यावर लाचलुचपत किंवा भ्रष्टाचाराचे आरोप होते. अशा प्रकरणांचा तपास केवळ दिल्ली विशेष पोलीस आस्थापना करू शकते, असा युक्तिवाद करण्यात आला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. केंद्राच्या कर्मचाऱ्यांविरुद्धच्या गुन्ह्यांचा तपास करण्याचा अधिकार केवळ सीबीआयकडेच मर्यादित नाही. राज्य पोलीस देखील अशा प्रकरणांचा तपास करून कायदेशीर कारवाई करू शकतात. कायदा आणि सुव्यवस्था हा राज्याचा विषय आहे. त्यामुळे राज्याच्या हद्दीत घडणाऱ्या कोणत्याही गुन्ह्याचा तपास करण्याचे अधिकार स्थानिक पोलिसांना संविधानाने दिले आहेत. या निर्णयामुळे भ्रष्टाचाराविरुद्धच्या मोहिमेला बळ मिळणार आहे. अनेकदा केंद्राच्या परवानगीच्या प्रतीक्षेत तपासाला विलंब होतो, जो आता टाळता येईल.

# तिसऱ्या मुंबईत एक लाख कोटीची गुंतवणूक येणार!

**मुंबई :** तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करतानाच तेथे पहिल्या टप्प्यात एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून त्यासाठीचे करारदेखील झाले आहेत, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केली.

येथील जागतिक आर्थिक गुंतवणूक परिषदेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत असलेले फडणवीस म्हणाले की, नवी मुंबई विमानतळापासून १५-२० किमीवर ग्रोथ सेंटर उभारले जाईल. या ठिकाणी 'प्लग ॲण्ड प्ले' या धर्तीवर 'रेडी टू स्टार्ट' पद्धतीने लगेच कामकाज सुरू होईल.

सिटी न्यूज अमरावती
गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## सांगळुद ते शेगाव पायी वारीचे आयोजन

**दर्यापूर :** तालुक्यातील सांगळूद येथून. गजानन महाराज पायदळ वारी दरवर्षी सांगळूत ते शेगाव आयोजित करण्यात येते तसेच महाआरती ही असते तसेच गुरुवार दि.२२ १ २०२६ हे १७९ वी महाआरती असेल त्या निम्मित सर्व पायदळ वारी वारकरी गजानन महाराज भक्त . गजानन महाराज संस्थान सांगळुद येथे १७९ वी महाआरती यजमान व महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

तरी आपण गजानन महाराज यांच्या दर्शनाला व महाप्रसादाला रात्री ठीक ८ वाजता आपण उपस्थित राहावे ही विनंती... आयोजक विपिन पाटील गावंडे सांगळुद ता. दर्यापूर यांनी केली आहे.

## महानगरपालिकेच्या गटनेतेपदी युवा स्वाभिमान पार्टीचे नगरसेवक ज्ञानेश्वर आमले यांची सर्वानुमते निवड

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अमरावती:** महानगरपालिकेच्या गटनेतेपदी युवा स्वाभिमान पार्टीचे नगरसेवक श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ नानाभाऊ आमले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडीसाठी आयोजित करण्यात आलेल्या पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत उपस्थित सर्व नगरसेवकांनी एकमताने हात वर करून अनुमोदन व समर्थन जाहीर केले आणि गटनेतेपदाच्या ठरावाला मंजुरी दिली. या बैठकीत युवा स्वाभिमान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी ज्ञानेश्वर ऊर्फ नानाभाऊ आमले यांची गटनेते पदी नाव सुचित करुन नगरसेवक प्रशांत वानखडे यांनी अनुमोदन करुन नगरसेवक सचिन भेंडेसह सर्व युवा स्वाभिमान पार्टीच्या नगरसेवकांनी हात वर करुन अनुमोदनाला समर्थन जाहीर करुन गटनेतेपदाच्या ठरावाला मंजुरी दिली. तसेच पक्षाची पुढील दिशा, महानगरपालिकेतील भूमिका, नागरिकांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठवणे तसेच विकासकामांना प्राधान्य देण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी सर्व नगरसेवकांनी नवनिर्वाचित गटनेते . ज्ञानेश्वर ऊर्फ नानाभाऊ आमले



यांच्यावर पूर्ण विश्वास व्यक्त करत त्यांच्या नेतृत्वाखाली संघटितपणे काम करण्याचा निर्धार केला.या निवडीबद्दल युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक व आमदार श्री. रवि राणा यांनी मुंबई येथून फोनद्वारे नवनिर्वाचित गटनेते श्री. आमले यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व नगरसेवकांनी एकजुटीने काम करून महानगरपालिकेत सामान्य जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडावेत, विकासकामांसाठी आग्रही राहावे आणि भ्रष्टाचाराविरुद्ध ठाम भूमिका घ्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.आ. रवि राणा यांचे मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले,ड्ढयुवा स्वाभिमान पार्टी ही केवळ राजकीय संघटना नसून जनतेच्या हक्कासाठी लढणारी चळवळ आहे. महानगरपालिकेत आपले सर्व नगरसेवक एकत्र येऊन काम करत असतील, तर शहराचा सर्वांगीण विकास निश्चितच वेगाने होईल. नानाभाऊ आमले यांच्यासारख्या अनुभवी व कार्यतत्पर कार्यकर्त्यांच्या हाती गटनेतेपदाची धुरा गेली आहे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. त्यांनी सर्व सहकारी नगरसेवकांना सोबत घेऊन जनतेचे प्रश्न सोडवावेत, विकासकामांना गती द्यावी व युवा स्वाभिमान पार्टीची ताकद सभागृहात ठळकपणे दाखवून द्यावी, हीच माझी अपेक्षा आहे.ड्ढनवनिर्वाचित गटनेते श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ नानाभाऊ आमले यांनीही सर्व नगरसेवकांचे व पक्षनेतृत्वाचे आभार मानून, पक्षाच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी प्रामाणिकपणे व कर्तव्यभावनेने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. महानगरपालिकेत सामान्य नागरिकांचे प्रश्न, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण या मूलभूत सुविधांसाठी युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने ठामपणे आवाज उठवला जाईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी सुनिल राणा, निळकंठराव कात्रे, कमल किशोर मालानी, जयंतराव वानखडे, शैलेंद्र कस्तुरे, सुखदेव तरडेजा, सत्येंद्रसिंग लोटे, विनोद जायलवाल, हरिश चरपे, शिवादास घुले, गंगाधर आवारे, गणेशदास गायकवाड, रत्नाकर चरडे, विदर्भ महिला अध्यक्षा ज्योती सैरिसे, जिल्हाध्यक्षा सोनाली नवले, शहर अध्यक्ष संजय हिंगासपुरे, संजय मुनोत, प्रमोद येवतीकर, यांच्यासह नगरसेवक प्रशांत वानखडे, सुमती ढोके, नाना आमले, अजय जयस्वाल, सचिन भेंडे, किशोर जाधव, नंदा सावदे, रजनी डोंगरे, महेश मुलचंदानी, प्रियंका भुषण पाटणे, अर्चना पांडे, योगेश विजयकर, प्रिती रेवणे, गौरी मेघवानी यांच्यासह हर्षल रेवेणे, विनोद गुहे, अविनाश काळे, नितीन अनासने, पवन भोयर, शैलेंद्र मेघवानी, सुनिल तरडेजा, निकेश खुरखुरिया, उज्वला नागदिवे, सुरेश पडोळे आदि उपस्थित होते.

## अमरावती महापौर पद सर्वसाधारण महिलांकरता राखीव

### ♦ अमरावती येणार महिला राज

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अमरावती :** महापालिका निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाला. त्यामुळे महापालिकेत १७ वे महापौर कोण ? याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

गुरुवारी झालेल्या महापौर सोडतीमध्ये अमरावतीचे महापौर पद सर्वसाधारण महिलांकरता राखीव झाल्याने आता अमरावती महिला राज येणार आहे.

गुरुवार, २२ जानेवारी रोजी मंत्रालयात नगरविकास राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेत महापौरपदाचे आरक्षण सोडत काढण्याचा निर्णय घेतला. महापालिकेत २२ प्रभागांतून ८७ सदस्य निवडून आले आहे. महायुतीत महापौरपद हे भाजपच्या वाट्याला जाईल असे संकेत आहे. रोटेशननुसार नवे महापौरपद ह १० मार्च १९९२ ते ८ मार्च २०२२ या ३० वर्षांच्या कार्यकाळात अमरावती महापालिकेत १६ महापौरांनी धुरा सांभाळली आहे तर ९ मार्च

२०२२ पासून तर आतापर्यंत महापालिकेत ड्ढ प्रशासकराजड्ढ सुरू आहे. भाजप २५, युवा स्वाभिमान पक्ष १५, काँग्रेस १५, एमआयएम १२, राष्ट्रवादी (अजित पवार) ११, शिंदेसेना ३, बसपा ३, उद्धवसेना २ आणि वंचित १ असे ८७ नगरसेवक निवडून आले आहेत. असे महापालिकेत पक्षीय बला बल आहे.

## प्रजासत्ताकदिनी देशभक्तीपर गीतांवर आधारित सामूहिक कवायत

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अमरावती:** प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२६ रोजी देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थ्यांचे सामुहिक कवायत संचलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरावर एकुण चार शाळा एकत्रित कवायत परेड मैदान, अमरावती येथे होणार असून या कवायतीसाठी १ हजार ५०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये प्रत्येक शाळेमधून व सामुहिकरित्या प्रत्येक तालुक्यातील तीन शाळा एकत्र येवून शाळेच्या मैदानावर देशभक्तीपर गीतांवर आधारित सामुहिक कवायत संचलन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. त्यासाठी दीड महिन्यांपासून शाळास्तरावर कवायत सराव सुरु आहे.

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीच्या शिरपेचात मानाचा तुरा

### ♦ विद्युत अभियांत्रिकीच्या मल्लेश्वरी राजपूत यांना टांग सूडो स्पर्धेत सुवर्णपदक

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अमरावती :** नुकताच दिल्ली येथे पार पडलेल्या १२ वी राष्ट्रीय टांग सू डो अजिंक्यपद स्पर्धेत पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती येथील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या कु. मल्लेश्वरी राजपूत यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. यासोबतच त्यांनी महाराष्ट्र संघासाठी प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवून देत महाराष्ट्राचा तसेच महाविद्यालयाचा गौरव वाढवला.

. मल्लेश्वरी राजपूत या विद्युत अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थिनी




असून त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे क्रीडा क्षेत्रासह शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचा सन्मान करण्यात येत आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मो. झुहैर, विभागप्रमुख डॉ. एस. बी. वरकड, सहाय्यक विभागप्रमुख डॉ. पी. आर. राणे तसेच विभागातील सर्व प्राध्यापकांनी कु. मल्लेश्वरी राजपूत यांचे अभिनंदन केले.

या यशामुळे महाराष्ट्रातील टांग सू डो खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली असून भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करण्यासाठी कु. मल्लेश्वरी राजपूत यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## प्लम्बींग व इलेक्ट्रीक वायरचे बंडल चोरणाऱ्या कुख्यात आरोपीला अटक

### ♦ २ लाखांवर मुददेमाल जप्त ♦ अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अमरावती :** गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन नागपूरी गेट हददीमध्ये पेट्रोलींग करत असताना गुप्त बातमीदाराकडून माहीती माहीती प्राप्त झाली कि अकबर नगर येथील रेकॉर्डवरिल गुन्हेगार नामे शेख जहीर उर्फ राजा रा अकबदर नगर हा जगवार कंपनीचे नळाचे साहीत्या विक्री करण्यासाठी कबाडी व्यवसाईकांकडे फिरत आहे.

सदर माहीतीवरून पोनि संदीप चव्हान, गुन्हे शाखा यांचे मार्गदशानामध्ये आज दिनांक २१/०१/२०२६ रोजी सपोनि मनीष वाकोडे याचे पथकाने आरोपी जहीर याला अकबर नगर येथून ताब्यात घेतले असता त्यानी त्याचे नाव आरोपी नामे जहिर खॉन वल्द जमीन खान उर्फ राजा वय २१ वर्ष रा अकबर नगर पूलाजवळ पो. स्टे नगापूरीगेट असे सांगीतले असून मिळालेल्या गुप्त बातमी अनुषगाने सविस्तर विचारपूस केली



असता त्यानी सदर माल हा सामरा नगर, जूणा बायपास एम.आय.डी. सी जवळ येथील नवीन निर्मानधीन इमरत येथून दोन दिवसपूर्वी त्याचा साथीदार नामे शेख अझरूदीन शेख कमरूदीन रा अकबर (फरार) याचे सह चोरल्याचे सांगीतले आहे. सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन राजापेठ येथे अपराध कं. ४४/२०२६ कलम ३०५ (अ), ३३३(३), ३३१ (४), भानस प्रमाणे नोंद असून सदर गुन्हात आरोपी जहीर याचे कडून खालील प्रमाणे माल जप्त करण्यात आला आहे. (जगवार कंपनीचे शावर, स्पाउट, वेस्ट कपलींग, कनसिल कॉक बॉडी, बेसीन कन्सील पार्ट एंजल कॉक इत्यादी १,२०,७११ रू चा मुददेमाल, ) गुन्हात वापरलेली ॲक्टीव्हा गाडी कं एम.एच.२७/ईए/७०२८ अंदाजे किमंत १,००,००० रू,) आरोपी कडून रोख रक्कम २००० रू असा एकूण २,२२,७११ रू चा माल जप्त करण्यात आला. आरोपी जहिर खॉन वल्द जमीन खान उर्फ राजा वय २१ वर्ष रा अकबर नगर पूलाजवळ पो.स्टे नागपूरीगेट शेख अझरूदीन शेख कमरूदीन रा अकबर (फरार) : असा एकून २,२२,७११ रू चा माल जप्त करण्यात आला.

सदर गुन्हातील अटक व फरार आरोपी हे सराईत चोरटे असून त्याची गुन्हा करण्याची पदधत हि नवीन निर्माणधीन इमारत मध्ये इलेक्ट्रीक वायर बंडल, प्लंबीग सामान व इतर बाधंकाम साहीत्य चोरण्याची आहे. बरेच ठिकाणी किरकोळ स्वरूपात माल चोरी गेल्याने तक्रारदार यानी तक्रार नोंद केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे परिमंडळ कं. ०१, पोलीस उपायुक्त श्याम घुगे परिमंडळ कं. २, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ (मुख्यालय/गुन्हे), सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) शिवाजी बचाटे, पोलीस निरिक्षक संदीप चव्हाण गुन्हे शाखा अमरावती यांचे नेतृत्वात, सपोनि मनीष वाकोडे, पोहेकॉ फिरोज खॉन, सतिश देशमूख, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, सैयद नाझीम, रणजीत गावंडे, चालक प्रभात पोकळे यांनी केलेली आहे.

## मेळघाटात बनावट ऑडिटच्या आधारे वन विभागाची फसवणूक

प्रतिनिधी २२ जानेवारी

**धारणी :** मेळघाट वन विभागात कूप वाटप प्रक्रियेत मोठा गैरप्रकार समोर आला आहे, सहकारी संस्थेने चक्क बनावट लेखापरीक्षण अहवाल आणि बोगस पावत्या सादर करून शासनाची दिशाभूल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्यादित, तारुबांदा या संस्थेच्या सचिवाने हा बनावटगिरीचा घाट घातल्याचा आरोप असून, याप्रकरणी आता फौजदारी कारवाईची मागणी केली आहे. यासंदर्भात जिल्हा उपनिबंधक, वन विभागासह संबंधित विभागांना जिल्हा संघाचे माजी सचिव जी. एस. जाधव यांनी तक्रार केली आहे. शासनाला फसवणूक करणारे प्रकार जंगल कामगार सहकारी संस्थांमध्ये सुरू आहेत. त्यावर कळस म्हणजे तारूबांदा जंगल कामगार सहकारी संस्थेच्या बनावट कागदपत्राचा कारनामा पुढे आला आहे. चक्क बनावट कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक केल्याचे सिद्ध झाले, तरी सचिवाला पदावरून हटवण्यात आले नाही. संपूर्ण भ्रष्टाचारात जिल्हा जंगल कामगार संघ आणि वन विभागातील काही बड्या अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचा आरोप केला आहे. मेळघाट वन विभाग, परतवाडांतर्गत येणाऱ्या कूपकामाची वाटप प्रक्रिया सन २०२५-२६ या वर्षासाठी राबविली. नियमानुसार, ही कामे मिळवण्यासाठी संस्थेचे मागील वर्षाचे ऑडिट अनिवार्य असते. तारूबांदा येथील संस्थेचे सचिव गोलू मुंडे यांनी सन २०२४-२५ या वर्षाचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्याचे भासवून, प्रमाणित लेखापरीक्षक आर. आर. नागतोडे यांच्या नावाचा बनावट अहवाल, ८५०० रुपयांची ऑडिट फी भरल्याची खोटी पावती अर्जासोबत जोडली.

लेखापरीक्षक आर. आर. नागतोडे यांनी जिल्हा उपनिबंधकांना संबंधित संस्थेचे कोणतेही लेखापरीक्षण केलेले नाही, माझ्या नावाने तयार करण्यात आलेला अहवाल आणि पावती पूर्णतः बनावट असल्याचे स्पष्ट केले आहे माहिती अधिकारात विशेष लेखापरीक्षक कार्यालयानेही संस्थेचे ऑडिट अपूर्ण असल्याचे कळवले आहे, हे विशेष. या फसवणुकीबाबत मेळघाटचे आमदार केवराम काळे यांच्याकडेही तक्रार करण्यात आली असून, त्यांनी या प्रकरणात लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आहे. शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित सचिवासोबतच त्याला मदत करणाऱ्या लिपिकांवर गुन्हे दाखल करून त्यांना निलंबित करण्याची मागणी जी. एस. जाधव यांनी केली आहे.

## आमझरी येथे 'मधाचे गाव' योजनेअंतर्गत आदिवासी महिलांना मधमाशी पालन प्रशिक्षण

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'मधाचे गाव' योजनेअंतर्गत जिल्ह्यातील आमझरी येथील स्थानिक आदिवासी महिलांना सातेरी मधमाशा पालनाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

साधनसंपत्ती आणि मुबलक फुलोरा असलेल्या या भागात मधमाशा संवर्धनातून निसर्गाचे रक्षण करणे, मध व त्यापासून तयार होणाऱ्या उत्पादनांची विक्री व्यवस्था करणे आणि



मधुपर्यटनाच्या माध्यमातून गावाला स्वयंपूर्ण बनविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यात पहिल्या टप्प्यात निवडण्यात आलेल्या १० गावांमध्ये आमझरीचा समावेश असून,सध्या जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली येथे विविध उपक्रम राबविले जात आहेत.


सद्यस्थितीत गावातील २१ महिलांना प्रशिक्षण दिले जात असून, भविष्यात गावातील प्रत्येक घरातील किमान एका सदस्याला प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये मधमाशांच्या जाती, निसर्गातील आग्या मधमाशांच्या वसाहतींपासून शास्त्रोक्त पद्धतीने मध संकलन, मध उद्योगातील उप-उत्पादने आणि मधुमक्षिका पालनाचे तांत्रिक ज्ञान दिले जात आहे. यासोबतच गावात प्रशिक्षणासह मधपेट्यांचे वाटप, मधुबनाची स्थापना, सामुहिक सुविधा केंद्र आणि माहिती दालनाची निर्मिती करण्यात येत आहे, ज्यामुळे हे गाव मध उत्पादनाचे एक प्रमुख केंद्र म्हणून नावारूपास येणार आहे, अशी माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी दिली आहे.

## हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादूरजी

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या शहिदीला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम राज्यस्तरीय समिती मार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी कार्यक्रम होत आहे. या निमित्ताने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अनमोल कार्याची ही माहिती...

महान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती-धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे ३५० वे शहिदी समागम वर्ष साजरे करीत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे.

अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा-पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे.



आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजांच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजीना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील.

त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूंसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादुरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे 'त्याग' आणि 'बलिदान' यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादुरजीचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे.

त्यांच्या बलिदानामुळे 'वसुधैव कुटुंबकम' या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला. शोख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजीनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले.

श्री गुरु तेग बहादुरजीना माहित होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धर्मासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू काळले नाहीत, धर्मकार्यावरील त्याची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादुर साँचे. सीवन में धर्म आणि मानवनातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानाचे सर्वोच्च उदाहरण औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांन शरणागती पत्करली नाही प्रत्यक्ष प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते मी शीख आहे आणि शिखच राहणार!

श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल, धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे. खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितको सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे.

आपण श्री गुरु तेग बहादुरजीचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे ठआपण आपले जीवन सुख-दुःखात तसेच मान-अपमानात समान भावनेने जगले पाहिजे.ठ त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादुरजीचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे. त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते.

**अनिल आलुरकर,** उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेत शुक्रवारी जिल्हा नियोजन समितीची सभा

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला:** राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात दि. २३ जानेवारी रोजी दु. १२ वा. जिल्हा नियोजन समितीची सभा आयोजित करण्यात आली आहे.

सभेत आधीच्या बैठकीच्या इतिवृत्ताचे अनुपालन, सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना प्रारूप आराखड्यास मान्यता देणे, खर्चाचा आढावा, पुनर्विनियोजन आढावा आदी विविध विषयांवर चर्चा होणार आहे.

## शिवर येथे श्री गजानन महाराजांच्या पालखीचे उत्साहात स्वागत



प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला:** अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कोळंबी येथून निघालेल्या श्री गजानन महाराजांच्या पालखीचे शिवर येथील अतिशय प्राचीन व जागृत श्री हनुमान मंदिरात २० जानेवारी २०२६ रोजी मोठ्या भक्तिभावात व उत्साहात स्वागत करण्यात आले. पालखी शिवर नगरीत दाखल होताच टाळ–मृदंगाच्या गजराने व 'जय जय गजानन महाराज' या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी श्री गजानन महाराजांच्या मूर्तीचे विधीवत व विविध पूजन करण्यात आले. भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती. याप्रसंगी सामूहिक आरती संपन्न झाली.

पायदळ वारीत सहभागी झालेल्या भाविकांसाठी अमीत ठाकरे व त्यांच्या परिवाराच्या वतीने अल्पोपहाराचे वितरण करण्यात आले. तसेच श्री गजानन महाराज पायदळ वारी समितीच्या वतीने ठाकरे परिवाराचा सत्कार करण्यात आला.

यानंतर श्री गजानन महाराजांची पालखी पुढील प्रवासासाठी शेगावकडे रवाना झाली. या पायदळ वारीमध्ये शिवर व परिसरातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून भक्तीभावाचे दर्शन घडवले.

# कुंड आदिवासी गावात बिबट्याने पाडला गाईचा फडशा

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोट:** कुंड गावात भुरी मोतीलाल जामूनकर यांच्या शेतात भर दिवसा शेतातील गाई व गुरे चरत असताना गाईवर बिबट्याने हल्ला करून तिला जागीच ठार केले. परिसरात शेती करणे तसेच गावात वावरणे जीव धोक्यात टाकल्यासारखे झाले आहे.

आदिवासी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रादेशिक, सामाजिक, नरनाळा वन विभागाशी संपर्क केला असता हे शिवार त्यांचे कार्यक्षेत्रात समाविष्ट नसल्याचे सांगितले. पण अशा प्रकारची शेतकऱ्यांच्या जीवितांची व जनावरांच्या भरपाईची कोण जबाबदारी घेणार ही बाब महत्वाची आहे.



याबाबतीत संबधित प्रशासनाने उपाययोजना न केल्यास आंदोलन उभारण्यात येणार आहे. उमरा जयपूर पिंप्री खुद.शेंत शिवारात बुधवार दि.२१ सकाळी दहा वाजता च्या सुमारास वाघाच्या पिल्लाला पिंप्रि खुद. ' जैनपूर चोरवड रस्त्यावर गावालगत संदीप मानकर यांच्या मक्याच्या शेतामधून रोडवरून राजू जवंजाळ यांच्या गव्हाच्या शेतामध्ये पाणी पिऊन जाताना स्वतः शेतकऱ्यांनी बघितले आहे. मंगळवारी मध्यरात्री उमरा शिवारात वाघाला नदीच्या पात्रातून ट्रक ड्रायव्हर यांनी नदीतून केळीच्या शेतात जाताना सुद्धा पाहिले आहे. त्यांची त्या ठिकाणी ठसे सुद्धा ताजे दिसत आहेत यावेळी या वन्य हिंसक प्राण्यांचे गावाच्या नागरिकांच्या संरक्षणाच्या उद्देशाने वन विभागाने या वन्यप्राण्यांचा बंदोबस्त काय कसा करतात याकडे सर्व आदिवासी बांधवांचे लक्ष लागले आहे.

> चोरवड रस्त्यावरील गव्हाच्या शेतात पाण्याच्या दांडावर वाघाचे पिल्लू पाणी पिताना पाहिले.
>
> **राजू शिंगणे,**
> पिंपरी जैनपूर, शेतकरी.

> माझा जीव वाचला बिबट्याला जेर बंद करा. गाईचे नुकसान मला ताबडतोब भरपाई द्यावे. दहशतीचे वातावरण वाढते आहे.
>
> **भुरी मोतीलाल जामुनकर,**
> कुंड, शेतमजूर,

> याबाबतीत संबंधित प्रशासनाने उपाय योजना न केल्यास सर्व आदिवासी बांधासह आंदोलनास उभारण्यात येणार आहे,
>
> **पांडुरंग तायडे**
> वीर एकलव्य, आदिवासी संस्था
> अध्यक्ष पोपटखेड

# रादेगो महिला महाविद्यालयात 'बोलींचा जागर'

**अकोला:** स्थानिक श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयात गुरूवारी 'बोलींचा जागर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठी भाषेच्या विविध बोलींचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्याच्या उद्देशाने तथा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त महाराष्ट्रातील विविध ३६ जिल्ह्यांमध्ये विद्यापीठस्तर आणि महाविद्यालयस्तरावर 'बोलींचा जागर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, जि. अमरावती आणि श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने 'बोलींचा जागर' या कार्यक्रमाचे आयोजन गुरूवार, दि.२२ जानेवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या दरम्यान करण्यात आले आहे.

'बोलींचा जागर' या कार्यक्रमांतर्गत सकाळी ९ ते १० शोभायात्रा/ग्रंथदिंडी आणि सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मुख्य कार्यक्रम अशा दोन सत्रात करण्यात आले आहे.

'बोलींचा जागर या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण लोककलांचे सादरीकरण, संवाद, बोली भाषा अभ्यासकांचे व तज्ञांचे मार्गदर्शन राहणार आहे.

# मारवाड़ी समाजातील विजयी नगरसेवकांचा सत्कार



प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला:** मनपा निवडणुकीत विजयी झालेल्या मारवाडी समाजातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा महाराष्ट्र प्रादेशिक मारवाड़ी सम्मेलन व मारवाड़ी युवा मंचच्या अकोला शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला.संमेलन व युवा मंचच्या पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित नगरसेविका मनीषा भंसाली, माजी महापौर विजयभाऊ अग्रवाल व सुनीता अग्रवाल, सागर भारुका आदींच्या निवासस्थानी जावून त्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छने सत्कार करून त्यांच्या सेवाकाळास शुभेच्छा दिल्यात.यावेळी मान्यवर नगरसेवकांनी पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करीत आपण समाजहित व नगर विकासाठी सक्रिय योगदान देणार असल्याची ग्वाही दिली.

यावेळी महाराष्ट्र प्रादेशिक मारवाड़ी सम्मेलनाचे प्रांतीय अध्यक्ष निकेश गुप्ता, शहर अध्यक्ष एड. सुरेश अग्रवाल, महामंत्री श्याम शर्मा, मारवाड़ी युवा मंचचे प्रांतीय उपाध्यक्ष रोहित रूंगटा, अकोला शाखा अध्यक्ष भुषण अग्रवाल, सचिव निर्मल समदड़िया,नीलेश बोर्डीवाला, संतोष छाजेड़, हरीश खंडेलवाल, मनोज अग्रवाल, प्रदीप रांदड़, केतन गुप्ता, श्रीकांत बंग, अभिजीत गोयनका,अभिषेक अग्रवाल, राहुल चौधरी, स्नेह छांवछारिया, रितिक अग्रवाल समवेत महाराष्ट्र प्रादेशिक मारवाड़ी सम्मेलन व मारवाड़ी युवा मंचचे बहुसंख्य पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

# मावशी केळकर यांचे नाट्यमय जीवनचरित्र सादर

◆ आद्य ब्रह्मवादिनी फाउंडेशनचे आयोजन

प्रतिनिधी २२ जानेवारी



**अकोला :** आद्य ब्रह्मवादिनी फाउंडेशन, अकोला यांच्या वतीने राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका लक्ष्मीबाई उपाख्य मावशी केळकर यांच्या जीवनकार्यावर आधारित लघु नाटिका २० जानेवारी रोजी प्रमिलाताई ओक सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या नाटिकेच्या उद्घाटन प्रसंगी मंचावर ब्रम्हवादिनी संस्थेच्या संस्थापिका डॉ. वृषालीताई शिलेदार, प्रकल्प प्रमुख जयश्रीताई धर्माधिकारी, राष्ट्रसेविका समितीच्या विदर्भ प्रांत सहकार्यवाहीका डॉ. राधाताई पुरी, नगर कार्यवाहिका वैशालीताई देशपांडे, अंजलीताई देशपांडे, डॉ. छाया नाईक डॉ. पारथासारथी शुक्ल उपस्थित होते. या नाटिकेतून मावशी केळकर यांचे राष्ट्रसेवा, संघटन, स्त्रीशक्ती उभारणी व सामाजिक कार्यातील योगदान प्रभावी नाट्यरूपात सादर करण्यात आले. प्रेक्षकांनी नाटिकेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांच्या अभिनयाचे भरभरून कौतुक केले. या कार्यक्रमाची संकल्पना व संस्थापना डॉ. वृषालीताई शिलेदार यांनी केली. नाटिकेचे लेखन डॉ. छाया नाईक यांनी व शब्द रचना श्रद्धाताई पाटखेडकर, जयश्री धर्माधिकारी यांनी मार्गदर्शन केले. दिग्दर्शनाची जबाबदारी सोनिया तऱ्हाळकर यांनी समर्थपणे पार पाडली. आयोजनात सोनाली हसराळे, दिपा देशपांडे, गायत्री देशपांडे, अनिता व्यवहारे तसेच संपूर्ण कार्यकारिणी मंडळाचे योगदान लाभले.

नाटिकेत मावशी केळकरांच्या भूमिकेत डॉ. पद्मजा पांडे, सेविका मनीषा मुळे, सारिका देशपांडे, डॉ. हेडगेवारांच्या भूमिकेत समीर थोडगे, स्वातंत्रवीर सावरकरच्या भूमिकेत निखिल पाटे यांच्यासह रेवती देशपांडे , शांभवी सोनगावळकर, वरद देशपांडे, प्रेरणा सोनगावळकर, नैतिक देशपांडे, वरद देशपांडे, विवान देशपांडे, मृदुला माळी, श्रेया ढोके, रूपाली शिकनकर, शकुनताई परांजपे यांनी विविध भूमिका साकारल्या.

## प्रजासत्ताक दिनाचा मुख्य सोहळा शास्त्री क्रीडांगणावर

**अकोला:** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ वा. लालबहादूर शास्त्री क्रीडांगण येथे होणार आहे. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. यावेळी ध्वजवंदन, राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत, पथकांचे अवलोकन, पथसंचलन, कवायती, चित्ररथ, सांस्कृतिक कार्यक्रम, गुणवंतांचा गौरव आदी कार्यक्रम होतील.

# सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा संमेलनाची धुम

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोट:** सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये २० रोजी क्रीडा संमेलन स्वतेजचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ६ ते ९ च्या विद्यार्थ्यांसाठी विविध मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाकरिता संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटीया, लुणकरण डागा ,प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दीपम लखोटिया, पालक प्रतिनिधी मोहम्मद अब्रार हुसेन मोहम्मद हुसेन, शंकर गरजे, श्रीकांत उगले, ज्ञानेश्वर सांगळे,शाळेचे प्रा. द्वारिका प्र.बसेर, कविता मिश्रा, व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर सरस्वती पूजन झाले व मान्यवरांच्या हस्ते मशाल पेटवून शौर्याचा संदेश देण्यात आला. नंतर वर्ग पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी




परेड द्वारे मान्यवरांना सलामी दिली. मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखविल्यानंतर क्रीडा स्पर्धेला सुरुवात झाली. ६ ते ९ च्या विद्यार्थ्यांसाठी हॉलीबॉल, रनिंग ,मिक्स रिले, लंगडी, टग ऑफ वॉरअसे विविध मैदानी खेळ घेण्यात आले.

पालक प्रतिनिधी ज्ञानेश्वर सांगळे सर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या भाषणातून खेळाचे महत्व पटवून दिले. व हार जीतला महत्त्व न देता खेळण्याचा संदेश दिला. त्यानंतर प्रमोद चांडक सरांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना खेळण्यातील आनंद आणि त्याचे महत्त्व सांगितले, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन पवन मोहता , मोहम्मद इजहार यांनी केले.

# सावरा ग्रामपंचायतला सीईओंची भेट

◆ मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा घेतला आढावा

प्रतिनिधी २२ जानेवारी



**अकोट:** सावरा अकोट पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत सावरा येथे शाश्वत विकासाची दूरदृष्टीपूर्ण लोकचळवळ समृद्ध पंचायतराज अभियान १७ सप्टेंबर ते ३१ मार्च २०२६ या कालावधी अंतर्गत सावरा ग्रामपंचायत येथे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत श्री परिहार, समाज कल्याण अधिकारी जाधव,गटविकास अधिकारी राजेश खुमकर, वाढणकर विस्तार अधिकारी मदनसिंग बहुरे,सोनवणे अभियानातील सर्व निकषांची पूर्तता करून उपक्रम राबवावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली बचत गटाच्या महिलांना योग्य मार्गदर्शन करून सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने प्रक्रिया पूर्ण करण्याचे ग्वाही ग्रामपंचायतने अधिकाऱ्यांना दिली यावेळी ग्रामपंचायत सरपंच स्वाती गुजरकर उपसरपंच धीरज गीते ग्रामपंचायत सदस्य सीमा धांडे ,सीमा सपकाळ दिगंबर सपकाळ, संजय सोनोने, ग्रामपंचायत अधिकारी व्ही व्ही भदे ,मानकर ,आशा वर्कर बँक सखी कृषी सखी आयसीआरपी ग्रामपंचायत प्रभाग संघ बीएफ विक्रम शेटे ग्रामपंचायत कर्मचारी ऑपरेटर व बहुसंख्य ग्रामस्थ सह महिलांचा मोठ्या संख्येत उपस्थित होते,

# रस्ता दुरूस्ती करा अन्यथा आंदोलन

◆ नगरसेवक गंपू शर्मा यांचा इशारा

प्रतिनिधी २२ जानेवारी

**मूर्तिजापूर :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते चिखली गेट दरम्यानच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांचे हाल वाढले असून अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नगरसेवक निलेश ऊर्फ गंपू शर्मा यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तातडीने रस्ता डांबरीकरण, मजबुतीकरण व खड्डे बुजविण्याची मागणी केली आहे.




२१ जानेवारी रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता यांना पाठविलेल्या निवेदनात शर्मा यांनी नमूद केले आहे की, सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून हा भाग बस स्टँड व रेल्वे स्टेशनला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे येथे सतत रहदारी सुरू असते. रस्त्याची अवस्था अतिशय खराब झाल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. खड्डयांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशीही त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

या निवेदनात त्यांनी पुढे म्हटले आहे की, हा परिसर त्यांच्या नगरसेवक प्रभाग क्रमांक ९ मध्ये येतो व संबंधित रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असल्यामुळे तात्काळ उपाययोजना करणे गरजेचे आहे. लवकरात लवकर खड्डयांना पॅच देऊन रस्ता डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी विभागाकडे केली आहे. या विषयाकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास शिवसेनेच्या वतीने नाइलाजास्तव आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.

# चंडिका देवी संस्थानच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोट:** अकोट तालुक्यामधील ग्राम चंडिकापूर हे गाव श्री चंडिका देवी माता संस्थानच्या नावाने जागृत देवीचे संस्थान प्रसिद्ध असून येथे आकोट नगरपालिका नवनिर्वाचित नगराध्यक्ष उपाध्यक्ष नगरसेवक व इतरही सदस्यांचा सन्मान करण्यात आला.



चंडिकापूर येथील श्री चंडिका देवी माता संस्थान च्या वतीने नगरपालिकेचे नर्वाचित निवडून आलेले सर्व नगरसेवक व सर्व सदस्य गन यांच्या उपस्थितीमध्ये सर्वप्रथम चंडिका देवीच्या मूर्तीचे पूजन करून हार पुष्प वाहनात आले व तदनंतर सत्कार समारंभ कार्यक्रमाला सुरुवात करते वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड किशोर देशपांडे हे लाभले असता सत्कारमूर्ती अकोट नगरपालिका उपाध्यक्ष प्रथमेश बोरोडे तर प्रमुख उपस्थिती सुशील पुंडकर आरोग्य सभापती, मनीष कराळे नगरसेवक, दिलीप बोचे, सौ विजयाताई बोचे, सौ सुनीताताई महल्ले , सौ शारदाताई मिसळे ,सौ गंगाबाई चंदन, बादल भैया अहिर, अचल बेलसरे, चेतन मर्दाने व चंडीकापूर सरपंच सौ प्रमिलाबाई अढाऊ, उपसरपंच राजकुमार खंडेराय, पो.पा.शंकर लोखंडे, शंकर मोरे, सेवा सो.अध्यक्ष बळीराम अढाऊ, दत्ताभाऊ सोनटक्के, गजानन अढाऊ, शंकर जंजाळ, केशव खंडेराय, नारायण पिलाहत्तर, बापूराव कराळे, माणिक जवंजाळ, बापूराव नितोने या सर्व पाहुण्यांचा व्यासपीठावर चंडिका देवी संस्थान अध्यक्ष ॲड. किशोर देशपांडे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व फुलपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. सर्वांना श्री चंडिका मातेचे फोटो सप्रेम भेट देण्यात आले.

तंटामुक्त अध्यक्ष गजानन कौलखेडे, विनोद तळोकार, चेतन पांडे भूषण शेंडोकार गौरव इंगळे अनिकेत सोळंके अक्षय चव्हाण सह सर्व सदस्यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक माजी उपसरपंच तुषार अढाऊ यांनी तर आभार प्रदर्शन माजी पं. स. सदस्य प्रमोद अढाऊ यांनी केले.

# अग्रवाल युवा संमेलनाची दिनदर्शिका वितरित




प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला:** महाराष्ट्र राज्य युवा अग्रवाल संमेलन जिल्हा शाखेच्या वतीने सातत्याने काढण्यात येणाऱ्या दिनदर्शिकेचे नुकतेच थाटात विमोचन करण्यात आले. आ. गोपीकिशन बाजोरिया यांच्या हस्ते व संमेलनाचे मार्गदर्शक निकेश गुप्ता,प्रांतिय उपाध्यक्ष रितेश चौधरी यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात भारतीय संस्कृतीतील सर्व सणा सुदीच्या प्रसंगाची माहिती असणाऱ्या दिनदर्शिकेचे विमोचन करण्यात आले.ही दिन दर्शिका समाजातील प्रत्येक घरात मोफत वितरित करण्यात येणार आहे.यावेळी निकेश गुप्ता यांनी या दिनदर्शिकेची माहिती दिली.माजी आ बाजोरिया यांनी युवा संमेलनाच्या या आगळ्या वेगळ्या उपक्रमाची प्रशंसा केली.प्रास्ताविक संमेलनाचे अध्यक्ष प्रतीक अग्रवाल यांनी, संचालन युवा संमेलनाचे सचिव सीए कुशल गोयनका यांनी तर आभार उपाध्यक्ष वैभव अग्रवाल यांनी मानलेत.कार्यक्रमाच्या सफलतेसाठी अध्यक्ष प्रतीक अग्रवाल,सचिव सीए कुशल गोयनका, उपाध्यक्ष वैभव अग्रवाल,अभिषेक अग्रवाल, कोषाध्यक्ष निलेश अग्रवाल,अकाउंट, सहसचिव यश सिंघानिया,प्रचार प्रमुख धवल अग्रवाल,माजी अध्यक्ष केतन गुप्ता, रितिक अग्रवाल, योगेश गोयल, रिशी अग्रवाल, शुभम अग्रवाल,पीयूष अग्रवाल,जेंष्ठ पदाधिकारी रोहित रूंगटा, मनोज अग्रवाल, अभिजीत गोयनका, रोहित गुप्ता, सर्वेश सोनालावाला, गणेश अग्रवाल, गोपाल टेकड़ीवाल, नंदकिशोर अग्रवाल खड़की आदींनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# फुले-आयुष्मान योजनेसाठी १३४ कोटींचा निधी

## ११ लाख ९६ हजार ३८७ लाभार्थ्यांना गोल्डन कार्ड : डॉ. ओमप्रकाश शेटे यांची माहिती

प्रतिनिधी २२ जानेवारी

**यवतमाळ** : महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी यवतमाळ जिल्ह्यात आतापर्यंत १३४ कोटी १७ लाख रुपयांहून अधिक निधी खर्च करण्यात आला.

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत जिल्ह्यात २४ लाख ३४ हजार ६७० पात्र लाभार्थी आहे. २३ सप्टेंबर २०१८ ते २० जानेवारी २०२६ या कालावधीत ११ लाख ९६ हजार ३८७ लाभार्थ्यांना गोल्डन कार्डचे वितरण करण्यात आले आहे. एकही पात्र नागरिक आरोग्य सेवेपासून वंचित राहता कामा नये, असे स्पष्ट निर्देश आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिले. येथील महसूल भवनात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी जिल्ह्यात एकत्रित राबविण्यात येत असलेल्या फुले व आयुष्मान आरोग्य योजनांचा सविस्तर आढावा सादर केला. डॉ. शेटे यांनी सांगितले की, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना २१ नोव्हेंबर २०१३ पासून दुसऱ्या टप्प्यात लागू असून यवतमाळ जिल्ह्यात ५९ रुग्णालयांमार्फत (२० शासकीय व ३९ खासगी) योजना राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत २३,९५७ लाभार्थ्यांना उपचाराचा लाभ, ४३,८१६ केसेस मंजूर, तर ७,१२९ शेतकरी लाभार्थ्यांना थेट उपचार देण्यात आले आहेत. दरम्यान,

### जिल्ह्यात ४०६ तक्रारी

■ योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान जिल्ह्यात ४०६ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी ४०४ तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे. केवळ २ तक्रारी प्रलंबित असल्याची माहिती देत, लाभार्थ्यांना पारदर्शक, गुणवत्तापूर्ण व वेळेत आरोग्य सेवा देण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे डॉ. शेटे यांनी सांगितले.

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत जिल्ह्यात २४ लाख ३४ हजार ६७० पात्र लाभार्थी असून, २३ सप्टेंबर २०१८ ते २० जानेवारी २०२६ या कालावधीत ११ लाख ९६ हजार ३८७ लाभार्थ्यांना गोल्डन कार्डचे वितरण करण्यात आले आहे. हे प्रमाण सुमारे ४९ टक्के आहे. उर्वरित लाभार्थ्यांपर्यंत आरोग्य सेवांचा लाभ पोहोचविण्यासाठी विशेष मोहिमा राबविण्याचे निर्देश देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# एफडीएने घेतले दुधाचे नमुने

प्रतिनिधी २२ जानेवारी

**आर्णी** : आर्णी शहरात भेसळयुक्त दुधाची विक्री होत असल्याची होरड होती. या संदर्भातील वृत्त प्रकाशित होताच अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने कारवाई सुरू केली आहे. बुधवारी सायंकाळी एफडीएच्या अधिकाऱ्यांनी आर्णीतील पाच दूध डेऱ्यांवर धाड टाकली. दुकानातील दूध व इतर दुग्धजन्य पदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेतले.

यवतमाळ येथील अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी अमित कुमार उपलप, वाघ, नरवाडे, आणि कापसे यांच्यासह कार्यरत असलेल्या टीमने आर्णी शहरातील पाच दुकांनांवर धडक दिली. त्यानंतर दुधाचे नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

## भेसळ आढळल्यास कठोर कारवाई

### आर्णीत भेसळयुक्त दुधाची विक्री

प्रतिनिधी २० जानेवारी

■ **आर्णी** : आर्णी शहरात भेसळयुक्त दुधाच्या विक्रीबाबत नागरिकांमध्ये चर्चा आहे. या प्रकारामुळे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दररोज शहरात मोठ्या प्रमाणात दुधाची विक्री होत असली तरी दुधाच्या पुरवठ्याबाबत पारदर्शकता नसल्याने संशय व्यक्त केला जात आहे.

#### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर



शहरातील विविध भागांत सकाळी व सायंकाळी दूध विक्री केली जाते. मात्र दूध संकलन, वाहतूक आणि विक्री प्रक्रियेवर नियमित तपासणी होत नसल्याने भेसळीची शक्यता नाकारता येत नाही, असे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्ती यांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दूषित अथवा निकृष्ट दर्जाच्या दुधाच्या सेवनामुळे पचनसंस्थेचे विकार, उलटी, जुलाब तसेच दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे दुधाच्या गुणवत्तेबाबत दक्षता आवश्यक असल्याचे ते सांगतात.

या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन तसेच संबंधित यंत्रणांनी दूध विक्री करणाऱ्या दुकानांची व वाहतूक व्यवस्थेची नियमित तपासणी करावी, दुधाचे नमुने तपासणीसाठी घ्यावेत आणि दोष आढळल्यास संबंधितांवर नियमांनुसार कारवाई करावी, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून होत आहे. शुद्ध व सुरक्षित दूधपुरवठा सुनिश्चित करणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, याबाबत तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तपासणी अहवाल आल्यानंतर दोषी आढळल्यास संबंधित डेरी चालकांवर दंडात्मक कारवाई केली जाईल, तसेच परवाने रद्द करण्याची शक्यता देखील नाकारली जात नाही. नागरिकांनी देखील भेसळयुक्त दूध विक्रीबाबत प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन केले आहे. आगामी काही दिवसांत शहरातील इतर दूध संकलन केंद्रांवर देखील अशाच प्रकारच्या अचानक धाडी टाकल्या जातील, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

> **अहवाल प्राप्त होताच कारवाई**
> ■ आर्णीतील पाच दुकानांमधून एकूण सात दुधाचे नमुने घेण्यात आले. यातील नमुने नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या आधारावर पुढील कारवाई केली जाईल, अशी प्रतिक्रिया अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी आनंद महाजन यांनी दिली.

# चला खेळूया उपक्रम: पुसदच्या ६ बॅडमिंटन खेळाडूंची निवड

प्रतिनिधी २२ जानेवारी

**पुसद** : जिल्हा प्रशासन आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तसेच जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "चला खेळूया" उपक्रमात पुसद तालुक्यातील सहा बॅडमिंटन खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या खेळाडूंना जिल्हास्तरीय स्पर्धा आणि प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. दिग्रस येथील तालुका क्रीडा संकुलात पार पडलेल्या बॅडमिंटन खेळाच्या




चार तालुक्यांच्या निवड चाचणीमध्ये पुसद, उमरखेड, दिग्रस, आणि महागाव तालुक्यांतील मुले आणि मुलींच्या गटांतून अनुक्रमे चार खेळाडूंची निवड करण्यात आली. यामध्ये विशेष म्हणजे, आठपैकी सहा खेळाडू पुसद तालुक्यातील आहेत.

निवड झालेल्या खेळाडूंमध्ये देवेश भंडारी, अनुज मुगवानकर, कृष्णा पवार, आणि अर्णव चंद्रकांत ठेंगे यांची सतरा वर्षाखालील मुलांच्या गटात तर शलाका मंगेश मुगवानकर आणि ईश्वरी रोकडे यांची मुलींच्या गटात निवड झाली आहे. क्रीडा अधिकारी श्रद्धा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रशिक्षक मंगेश मुगवानकर यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन आणि खेळाडूंच्या सातत्यपूर्ण सरावामुळेच या खेळाडूंनी यश प्राप्त केले, असे मत क्रीडा अधिकारी श्रद्धा सावंत यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर, खेळाडूंच्या मेहनत आणि पालकांच्या सहकार्यानेच ही निवड यशस्वी झाली, असे त्यांनी सांगितले.

# रस्त्यावर आढळला मृतदेह

प्रतिनिधी २२ जानेवारी

**उमरखेड** : उमरखेड शहरातील नांदेड रस्त्यावर, भुराजी मेडिकल समोर, आज सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास एका ४० वर्षीय इसमाचा मृतदेह आढळला. मृतकाची ओळख पोलिसांनी पुढील तपासादरम्यान मराठवाड्यातील रामराव पांडुरंग शिंदे (रा. पळसपुर, ता. हिमायतनगर) असे केली आहे.

माहितीनुसार, मृतक मागील आठ दिवसापासून घरातून निघून गेले होते. काही नातेवाईकांच्या माहितीनुसार, तो पुणे येथे कामानिमित्त गेला होता. रस्त्यावर मृतदेह निद्रा अवस्थेत आढळल्याने नागरिकांमध्ये खळबळ उडाली, तसेच घटनास्थळी मोठी गर्दी झाली. पोलिसांनी तात्काळ पंचनामा करून शव उपजिल्हा रुग्णालयात पाठविला. डॉक्टरांनी उपचारादरम्यान मृत्यूची पुष्टी केली, परंतु मृत्यूचे नेमके कारण अद्याप समजलेले नाही.

सदर प्रकरणी पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गोपींवार आणि पोलीस कर्मचारी अंकुश दरबस्तेवार तपास करत आहेत. मृतकाचा परिवार पत्नी व तीन मुले असल्याची माहिती मिळाली आहे.

यावेळी एक गंभीर समस्या उघडकीस आली आहे – उपजिल्हा रुग्णालयात मागील दोन-तीन वर्षांपासून शवविच्छेदक (सेवागार परिचर) नाही. यामुळे मृतकाच्या नातेवाईकांना शवविच्छेदासाठी तासंतास तटकळ करावी लागते, तसेच खाजगी व्यक्तीकडून सेवेसाठी आर्थिक खर्चही भरणा करावा लागतो. याबाबत संतोष मुडे, अध्यक्ष, महात्मा फुले दैनिक पत्रकार संघ यांनी शासनाकडे तातडीने शवविच्छेदक नेमण्याची मागणी केली आहे.

गावकरी आणि नागरिकांमध्ये या टंचाईमुळे संताप निर्माण झाला असून, प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पर्यावरणपूरक सवयी म्हणजे पृथ्वीशी न्याय

## ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार ठेंगेकर

प्रतिनिधी २२ जानेवारी

**आर्णी** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत अंबोडा ग्रामपंचायतीने प्लास्टिकमुक्त गावाच्या दिशेने ठोस पावले उचलली असून, एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकवर बंदी घालण्यात आली आहे. यानंतर गावात संकलित प्लास्टिकची प्रतीकात्मक 'होळी' करून जनजागृती करण्यात आली.

प्लास्टिक निर्मूलन हे स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरण संतुलनासाठी अत्यावश्यक आहे. प्लास्टिकमुळे माती, पाणी व अन्नसाखळीवर होणारे दुष्परिणाम भविष्यातील पिढ्यांसाठी धोकादायक ठरू शकतात. नागरिक, प्रशासन व उद्योग यांचा संयुक्त सहभाग असल्यास प्लास्टिकमुक्त परिसर उभारणे शक्य आहे. पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे म्हणजे केवळ नियम पाळणे नव्हे, तर पृथ्वीशी न्याय करणे आहे, असे प्रतिपादन ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार ठेंगेकर यांनी केले. ग्रामपंचायत अंबोडा येथे प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. गावातील सार्वजनिक ठिकाणे, दुकाने व रस्त्यांवरून प्लास्टिक वेचण्याचा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये युवक मंडळ, महिला बचत गट तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यामुळे गाव परिसर स्वच्छ व प्रसन्न दिसू लागला.



संकलित प्लास्टिकची प्रतीकात्मक 'होळी' करून प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांच्या लक्षात आणून देण्यात आले. प्लास्टिकमुळे प्राणी-पक्षी, माती व पाण्यावर होणारे नुकसान तसेच मानवी आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची माहिती देत पर्यावरणपूरक व जैवविघटनशील पर्याय वापरण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. वर्षाताई बाबाराव आडे, उपसरपंच चंचलाताई ज्ञानेश्वर पावडे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून माजी पोलीस पाटील विलासरावजी राऊत उपस्थित होते. तर मार्गदर्शक म्हणून ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार ठेंगेकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक अंकुश मोरे, विकास गंगा समाजसेवी संस्था व रिलायन्स फाउंडेशनचे वैभव गायकी, यशवंतराव वंजारे आदी उपस्थित होते.

माजी पोलीस पाटील विलासरावजी राऊत म्हणाले, "हा उपक्रम केवळ स्वच्छतेपुरता मर्यादित नसून अंबोडा गाव पूर्णतः प्लास्टिकमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग हाच या मोहिमेचा खरा आधार आहे."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव गायकी यांनी केले. प्रास्ताविक विजयकुमार ठेंगेकर तर आभारप्रदर्शन अंकुश मोरे यांनी केले. या उपक्रमास शेकडो ग्रामस्थ, महिला व लहान मुलांनी सहभाग नोंदविला.

# शेतात ८ फूट लांबीचा अजगर आढळला



प्रतिनिधी २२ जानेवारी

**महागाव** : अंबोडा येथील शेतकरी दत्ता पतंगराव यांच्या शेतात ऊसतोड सुरू असताना आज सकाळी अजगर जातीचा साप आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सुमारे ८ फूट लांबीचा व अंदाजे १० किलो वजनाचा हा अजगर ऊसशेतात दडून बसला होता.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक सर्पमित्र शुभम कालेवाड, लखन व हर्षद यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अत्यंत काळजीपूर्वक आणि सुरक्षित पद्धतीने अजगराला पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.


हे तिन्ही सर्पमित्र अंबोडा गावचेच असून, त्यांच्या तत्परतेमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी सर्पमित्रांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

# २७ जानेवारीला वृद्ध कलावंतांची सभा

प्रतिनिधी २२ जानेवारी

**यवतमाळ** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास व सन्मान संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जिल्ह्यातील शासकीय मानधन लाभधारक वृद्ध कलावंतांची महत्त्वपूर्ण सभा सोमवार, दि. २७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता मानवता मंदिर, आर्णी रोड, यवतमाळ येथे आयोजित करण्यात आली आहे.

या सभेत केंद्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून मिळणाऱ्या मानधनासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेली शासनमान्य कलावंत समितीची प्रशस्तीपत्रे लाभार्थ्यांना प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच, मानधन सुरू असताना निधन झालेल्या कलावंतांच्या वारसांना



कायदेशीर वारसाचा न्यायालयीन आदेश नसल्याने रखडलेले मानधन, निवड यादीत नाव असूनही खात्यावर जमा न झालेले मानधन तसेच किरकोळ तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित असलेल्या प्रकरणांवर चर्चा करून तात्काळ कार्यवाहीसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.


यासोबतच अपघात, दुर्घटना अथवा दुर्धर आजारामुळे मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या वृद्ध कलावंतांना किमान दहा लाख रुपयांचा विमा शासनाकडून मिळावा, शासकीय मानधन मंजूर झालेल्या सर्व वृद्ध कलावंतांचा दरवर्षी शासनातर्फे सन्मानराशी देऊन गौरव करावा, मानधनात वाढ करून ते दहा हजार रुपये करावे, वृद्ध कलावंतांना एस.टी. प्रवास मोफत मिळावा, तसेच बिनव्याजी कर्ज सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशा विविध न्याय्य मागण्यांवरही विचारविनिमय करण्यात येणार आहे. या सर्व मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. जिल्ह्यातील सर्व शासकीय मानधन लाभधारक वृद्ध कलावंतांनी या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. श्याम खंडारे, उपाध्यक्ष सिद्धार्थ भवरे, महासचिव गंगाधरजी घोटेकर, जिल्हाध्यक्ष (पूर्व) राजेश मडावी, जिल्हाध्यक्ष (पश्चिम) गणेशराव धर्माळे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# घरकुल योजनेमुळे ग्रामीण नागरिकांचा सामाजिक स्तर उंचावला

प्रतिनिधी २२ जानेवारी

**उमरखेड** : ग्रामीण भागातील कुटुंबांना स्वतःचे घर असावे, यासाठी 1985 पासून इंदिरा आवास योजना राबविण्यात आली. नंतर 1 एप्रिल 2016 पासून या योजनेचे नाव बदलून प्रधानमंत्री आवास योजना, अनुसूचित जातीसाठी रमाई योजना, आदिवासींसाठी शबरी घरकुल योजना आणि ओबीसी प्रवर्गातील घरकुल योजना राबविली जात आहे. तसेच नोंदणीकृत बांधकाम मजुरांसाठीही घरकुल योजना उपलब्ध आहे. या योजनांचा उद्देश बेघर कुटुंबाला मूलभूत सुविधा असलेले पक्के घर उपलब्ध करून देणे हा आहे.

योजनेची पात्रता अशी आहे की, अर्जदार किमान पंधरा वर्षे त्या भागात रहिवासी असावा. ग्रामीण कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न 1.20 लाख रुपये, तर



शहरी कुटुंबांचे 3 लाख रुपयांपेक्षा कमी असावे. ज्यांच्याकडे स्वतःचे घर नाही आणि ज्यांनी यापूर्वी घरकुल योजनेचा लाभ घेतला नाही, ते पात्र ठरतात.

बांधकामासाठी ग्रामीण लाभार्थ्यांना 1.35 लाख, शहरी लाभार्थ्यांना 2.50 लाख रुपये, तर आदिवासी व मागास भागातील कुटुंबांना विशेष प्राधान्य देऊन जास्त निधी उपलब्ध केला जातो. अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात बांधकामाच्या टप्प्यानुसार जमा होते. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत पर्यावरणपूरक ऊर्जा वापरासाठी 50,000 रुपये देण्यात येतात; मात्र सध्या लाभार्थ्यांचा सौरऊर्जा वापराकडे फारसा कल दिसत नाही. ग्रामीण घरकुलासाठी 25 चौ.मी. आणि शहरी भागासाठी 323 चौ.मी. बांधकाम अपेक्षित आहे, ज्यात एक खोली, स्वयंपाकघर आणि शौचालयाचा समावेश आहे. राज्य सरकारने 2025-26 मध्ये 19,497 घरकुल बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले असून 9,202 कोटींची तरतूद केली आहे.

सिमेंट, रेती, गिट्टी, लोखंड व मजुरी यांचा खर्च लक्षात घेतल्यास घरकुलाचे बांधकाम 5 लाख रुपये पर्यंत येते. रेती घाट बंद असल्याने लाभार्थ्यांना चोरट्या मार्गाने खरेदी करावी लागत आहे, परिणामी घरकुल बांधकाम अर्धवट राहते.

> ■ तरीही घरकुलामुळे ग्रामीणांच्या राहणीमानात बदल झाला आहे, ऊन-पाऊसापासून संरक्षण मिळाले असून सामाजिक स्तरही उंचावला आहे. लाभार्थ्यांनी बांधकाम पूर्ण केलेले घर स्वीकारले असून, यामुळे त्यांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे. लोकप्रतिनिधींनी घरकुल अनुदान वाढीसाठी अधिक लक्ष देण्याची गरज आहे.
> - पुंजाजी खडसे

# बारा नागरिकांना मोबाईल परत

## CEIR पोर्टलच्या मदतीने यवतमाळ शहर पोलिसांची यशस्वी कामगिरी

प्रतिनिधी २२ जानेवारी

**यवतमाळ** : पोलीस स्टेशन यवतमाळ शहरात आज विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या हस्ते नागरिकांचे हरविलेले एकूण १२ मोबाईल परत करण्यात आले. ही मोहीम पोलीस अधिक्षक श्री कुमार चिंता यांच्या संकल्पनेनुसार पोलीस व जनता यांच्यातील विश्वास वाढविण्यासाठी आणि पोलीस समन्वयाची संकल्पना राबविण्यासाठी यवतमाळ जिल्हा पोलीस दलाकडून 'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत आयोजित करण्यात आली होती. पोलीस स्टेशन यवतमाळ शहरात नागरिकांनी हरविल्याबाबत तक्रार दिलेली होती. त्यानुसार तक्रारदारांचे मोबाईल शोधण्यासाठी CEIR पोर्टलचा वापर करून तपास करण्यात आला. या कार्यवाहीत किंमत अंदाजे १,३७,०००/- रुपये असलेले १२ मोबाईल शोधून काढले गेले. विशेष प्रसंग म्हणजे, आज मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, परिक्षेत्र अमरावती यांची पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे सप्राईज व्हिजीट होत होती. या भेटीदरम्यान नागरिक संतोष तुकाराम सोयाम यांचा हरविलेला मोबाईल तसेच इतर तक्रारदारांचे मोबाईल त्या तक्रारदारांना परत करण्यात आले.



सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधिक्षक अशोक थोरात, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस स्टेशन यवतमाळ शहराचे ठाणेदार पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव, पोलीस अंमलदार रविंद्र नेवारे आणि अंकुश फेंडर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## जाहीरनामा

तहसिल कार्यालयातील संदर्भ विषयान्वये अर्जदार गजानन साहेबराव कन्हाळे रा.माळेगाव यांनी त्यांच्या मुली करीता कुमारी सानिका गजानन कन्हाळे यांच्या जन्माची नोंद दिनांक 01/05/2007 रोजी जन्म झाला आहे.परंतु त्यांच्या जन्माची नोंद सचिव ग्रामपंचायत माळेगाव ता.महागाव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13,3 नुसार नगर सचिव ग्रामपंचायत माळेगावच्या जन्माची नोंद घेण्याबाबत आदेशीत करणेबाबतचे प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तेंव्हा आपणास कळविण्यात येते की,सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंदणी जन्म कुठे व कधी झाला याबाबत चौकशी करून आवश्यक दस्तावेजासह आपल्या स्वयं स्पष्ट अभिप्राय अहवाल तात्काळ या कार्यालयात सादर करीत असुन यावर कोणाचा काही आक्षेप असल्यास 15 दिवसात कालावधीत कळविण्यात यावे.

शिक्का

स्वा./-
तहसिलदार, महागांव

## जाहीरनामा

तहसिल कार्यालयातील संदर्भ विषयान्वये अर्जदार गजानन साहेबराव कन्हाळे रा. माळेगाव यांनी त्यांच्या मुला करीता सोहम गजानन कन्हाळे यांच्या जन्माची नोंद दिनांक 30/09/2009 रोजी जन्म झाला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद सचिव ग्रामपंचायत माळेगाव ता.महागाव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13,3 नुसार नगर सचिव ग्रामपंचायत माळेगावच्या जन्माची नोंद घेण्याबाबत आदेशीत करणेबाबतचे प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तेंव्हा आपणास कळविण्यात येते की,सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंदणी जन्म कुठे व कधी झाला याबाबत चौकशी करून आवश्यक दस्तावेजासह आपल्या स्वयं स्पष्ट अभिप्राय अहवाल तात्काळ या कार्यालयात सादर करीत असुन यावर कोणाचा काही आक्षेप असल्यास 15 दिवसात कालावधीत कळविण्यात यावे.

शिक्का

स्वा./-
तहसिलदार, महागांव

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि. २२ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## पोस्टर व निबंध स्पर्धांद्वारे जनजागृती



**वाशीम :** रस्ता वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने १ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत ३७ वा राज्य रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने शहरात विविध जनजागृतीपर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.भारतामध्ये रस्ते अपघातांमुळे दर तासाला सुमारे १७ नागरिकांचा मृत्यू होतो, तसेच चालकांच्या निष्काळजीपणामुळे दरवर्षी जवळपास दीड लाख व्यक्ती आपले प्राण गमावतात. या पार्श्वभूमीवर रस्ता सुरक्षा सप्ताहात विविध स्पर्धांद्वारे सुरक्षित वाहतुकीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात आला. यावेळी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक रविदास विनकरे, मोहिनी मोरे, वाहन चालक राहुल तिडके व रामेश्वर मार्कंडे यांनी एनसीसी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना मार्गदर्शन केले. पोस्टर व निबंध स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना समारोपीय कार्यक्रमात बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

## आंदोलनातून मिळेना न्याय, दिव्यांगावर १८ वर्षापासून अन्याय...

# शासकीय धोरण, त्रास विनाकारण, शेतकऱ्यांचे मरण !

*** सहनशिलतेचा संपला अंत, अधिकाऱ्यांना नाही खंत * आता २६ जानेवारीला नाही राहायचे जीवंत...**







**• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •**

रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथील दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखडे यांची शेतजमीन अधिकाऱ्यांनी कागदोपत्री चोरली आहे. ती परत मिळविण्यासाठी गेल्या १८ वर्षापासून लोकशाही व्यवस्थेनुसार प्रशासनाशी लढत आहेत. निवेदन, आंदोलन, उपोषण करून न्याय मिळत नसल्याने दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांच्या सहनशिलतेचा अंत संपला आहे. मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांना याची खंत नाही. त्यामुळे जीवंतच राहायचे नाही असे त्यांनी ठरविले आहे. ते २६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहेत. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे शासकीय धोरणामुळे दिव्यांग शेतकऱ्याला विनाकारण त्रास होवून मरण यातना भोगाव्या लागत आहे.

दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांची शेती १८ वर्षापूर्वी तलाठी मंडळ अधिकारी तहसीलदार व काही गावातील प्रतिष्ठांनी संगणमत करून कागदोपत्री चोरली. या सर्वांचे पुरावे असूनही न्याय न मिळाल्याने निवेदन ,आंदोलन , उपोषण दरवर्षी दरदिवशी दिव्यांग शेतकरी लढा देत आहेत. गेल्या वर्षीही दिवाळीला त्यांनी पोस्टरव्दारे त्यांनी 'आमची सहनशिलता संपली, उखाळ्या, पाखाळ्या, कुरघोड्या बंद करा, शेतकऱ्यांना भिक नको कुत्रे आवरा, रक्षकच झाले भक्षक, जिल्हयातील भ्रष्टाचारी प्रशासनाचा नंगानाच बंद करा' अशी वाक्ये लिहून पोस्टर प्रदर्शनातून आंदोलन केले होते. यासोबतच 'न्याय देता का कधी भेटु?' असा सवालही या पोस्टरव्दारे बाबुराव वानखडे प्रशासनाला विचारला होता.

यासंदर्भात त्यांनी याआधी वेळोवेळी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथे ५४/२ हा गट क्रमांक अस्तित्वातच नाही. मात्र शासकीय रेकॉर्डमध्ये अस्तित्वातच नसलेल्या गट क्रमांकाची तहसिल प्रशासन आणि पटवारी ससाने, ज्ञानेश्वर पवार, आर. आर. बोरकर यासह सर्वसंबंधीतांनी संगनमताने निर्मिती करुन त्याव्दारे शासनाची मोठी फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणातील मौजे अंचळ येथील मुख्य सुत्रधाराला अटक करण्यात यावी. तसेच आपण शासकीय कागदपत्रानुसार गट क्रमांक दाखविणाऱ्यास १० लाख रुपयाचे रोख बक्षीस देवू अशी घोषणाहर दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांनी केली आहे.

निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, मौजे अंचळ येथे गट नंबर ५४/२ हा नाही. परंतु ५४/२ हा बोगस गट नंबर तयार केला आहे. सदर शेतजमिनीवर हा गट नंबरच अस्तित्वात नाही. मी अंचळ येथील दिव्यांग व अशिक्षीत शेतकरी असून अंचळ शेतशिवारात गट २४१ व शेत सर्वे ५४/२ अधिक ३ मध्ये १३ एकर ४ गुंठे मालकीची शेतजमीन आहे. मात्र भूमि अभिलेख कार्यालय रिसोड यांनी शेत सर्वे ५४/२ मधील रेकॉर्डची फिरवाफिरवी करुन शेत सर्वे ५४/४ मधील लक्ष्मण अर्जुना भंगी यांची जमीन वाढविली.

या प्रकरणात आश्रु वानखेडे, सिताराम वानखेडे, तुकाराम वानखेडे, नारायण भंगी, हरिभाऊ भंगी यांच्यासह पटवारी सिताराम वानखेडे केनवड, पटवारी लोभाजी धोत्रे मानोरा, तत्कालीन तहसिलदार, तत्कालीन मंडळ अधिकारी हे सहभागी असल्याचा आरोप बाबुराव वानखेडे यांनी निवेदनाव्दारे केला आहे. तसेच पटवारी ससाने यांना जमिनीचा नकाशा सुध्दा समजत नाही. यातील सहभागी मुख्य सुत्रधाराने १० एकर जमिनीची १०० एकर कशी वाढविली याचीही चौकशी झाली पाहीजे.




या प्रकरणी माझी जमीन मला परत मिळण्यासाठी मी गेल्या बारा वर्षापासून तहसिलदार, जिल्हा भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, पालकमंत्री, खासदार, आमदार, मुख्यमंत्री आदींना असंख्य वेळा निवेदने दिली आहेत. मात्र माझ्या निवेदनाला प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कचऱ्याची टोपली दाखविली व मला न्याय मिळाला नाही. यासदंर्भात केलेल्या उपोषणात केवळ कोरडी आश्वासने देण्यात आली. तरी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन मुख्य सुत्रधारांना अटक करण्यात यावी अशी मागणी दिव्यांग शेतकरी वानखेडे यांनी केली आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी व्हावी व प्रशासनाने शासनाच्या लेखी असलेला बोगस ५४/२ हा गट नंबर दाखवून द्यावा. गट नंबर दाखवून देणाऱ्याला आपण ताबडतोब १० लाख रुपयाचे बक्षीस देवू असे आवाहन वानखेडे यांनी प्रशासनाला केले आहे. त्यामुळे आता २६ जानेवारी रोजी पुन्हा आत्मदहन




## थोडक्यात

### पिंप्री सरहद्द येथील शेतकऱ्याचा बैल दगावला !

**कष्टकरी शेतकऱ्यावर दुःखाचा डोंगर ओढावला**

**• सिटी न्युज ब्युरो @ केनवड •**

पिंपरी सरहद्द येथील शेतकरी सुभाष हजारे यांच्या शेतात घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे कुटुंबावर मोठे संकट ओढावले आहे. हजारे हे स्वतःच्या दोन ते तीन एकर जमिनीवर तसेच भागीदारीत तीन ते चार एकर अशा एकूण जमिनीत भाजीपाला शेती व दुग्ध व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करत असतात. या सर्व उत्पन्नावरच त्यांचे संपूर्ण कुटुंब अवलंबून आहे.



कर्ज काढून त्यांनी शेतालगत गुरांचा कोठा उभारला असून त्यामध्ये म्हशी, दुग्ध व्यवसायासाठी लागणारी यंत्रसामग्री तसेच बैलजोडी ठेवली होती. काल नेहमीप्रमाणे सायंकाळची कामे आटोपून बैलांना चारापाणी देऊन कोठ्यात बांधले,व म्हशीचे दूध काढून घरी गेले. रात्री जेवणानंतर कोठ्यावर झोपण्यासाठी गेले असता सुमारे दहा वाजताच्या सुमारास एक बैल अचानक मृत्युमुखी पडलेला आढळून आला.या वेळी मृत बैलाच्या तोंडातून रक्तस्त्राव होत असल्याचे दिसून आले, त्यामुळे बैलाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत शंका निर्माण झाली आहे. सायंकाळपर्यंत बैल पूर्णपणे ठणठणीत असताना अचानक अशी घटना घडल्याने हजारे कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे. विषबाधा, विद्युत शॉक किंवा अन्य कोणते कारण असू शकते का, याबाबत स्पष्टता अद्याप झालेली नाही.भाजीपाला हंगाम सुरू असताना व दुग्ध व्यवसायासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला बैल दगावल्यामुळे आता शेतीची कामे कशी करायची आणि उदरनिर्वाह कसा चालवायचा असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा राहिला आहे. या घटनेचा तातडीने पंचनामा करून पशुवैद्यकीय तपासणी करण्यात यावी तसेच संबंधित शेतकऱ्याला प्रशासनाकडून आर्थिक मदत व योग्य भरपाई मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# जिल्ह्यातील पोकरा घोटाळ्याची एसआयटी नेमून सखोल चौकशी करा !

**शेतकऱ्यांच्या हक्काचा मलिदा लाट नाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा**

***अन्यथा विधान भवनासमोर आंदोलन छेडण्यात येईल *किसान काँग्रेसचा ईशारा**

### 'योजना शेतकऱ्यांसाठी, लाभ मात्र दलालांना - किसान काँग्रेस

नैसर्गिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना शाश्वत दिलासा मिळावा या स्तुत्य हेतूने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना राबविण्यात येत आहे. न भूतो न भविष्यातही अशी ही महत्वाकांक्षी योजना आहे. मात्र कृषी विभागाच्या नियोजनशून्य संनियंत्रणामुळे या योजनेचा लाभ शेतकऱ्यांपेक्षा कृषी विभागातील तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक आणि पर्यवेक्षक व शेतकऱ्यांच्या नावावर दलाली करणाऱ्यांनीच लाटला आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या हक्काचे अनुदान हडपले गेले आहे. याची कसून चौकशी करावी व संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी जेणेकरून पोकरा भाग दोन व ईतरही कृषी योजनेत भ्रष्टाचार करण्यास अधिकारी, कर्मचारी धजावणार नाही असे किसान काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष गौरीशंकर मुळे यांनी म्हटले आहे.



**• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •**

वाशीम जिल्ह्यातील बहुचर्चित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजनेतील अर्थात पोकरा घोटाळा आता राज्यस्तरावर चर्चेचा विषय बनला आहे. रिसोड तालुक्यातील पोकरा गैरप्रकरणाने संपूर्ण जिल्हा ढवळून निघाला असताना या गंभीर प्रकरणात विविध शेतकरी संघटना आक्रमक होत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत आहेत. त्या अनुषंगाने भारतीय किसान काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष गौरीशंकर मुळे यांनी वाशिम जिल्ह्यातील पोकरा घोटाळ्याची एसआयटी नेमून सखोल चौकशी करावी व संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. थातुरमातुर प्राथमिक चौकशी करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला जात असल्याची तक्रार संघटनेकडे आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्या अनुषंगाने तपास अधिकारी यांनी तपास कार्यात दिरंगाई करून कारवाईस विलंब केला तर विधान भवनासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा ईशारा मुळे यांनी दिला आहे.



रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील एका शेतकऱ्याने पोकरा गैरप्रकाराची तक्रार वरिष्ठ स्तरांवर दाखल करूनही सदर प्रकरणाची थातुरमातुर चौकशी होत असल्याची तक्रार संघटनेकडे तक्रारदार यांनी केली आहे. सदर तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, गावपातळीवरील कृषी विभागातील कृषी सहाय्यक, पर्यवेक्षक आणि तालुका कृषी अधिकारी यांनी काही दलाल शेतकऱ्यांच्या नावावर पात्र शेतकऱ्यांना डावलून लाखों रुपयांचे अनुदान हडपले आहे. यात केवळ फळबाग लागवड आणि ईतर घटकच नव्हे; तर नियमबाह्य सिंचन विहीरी देऊन लाखोंचा मलिदा हडप केला आहे. शिवाय अनेक प्रस्ताव चुकीचे जोडण्यात आले आहेत. गट नंबर एक तर अनुदान दुसऱ्याच गट नंबरच्या नावाखाली दिले असल्याची खळबळ उडवून देणारा घोटाळा समोर येत आहे. तीच अवस्था शेडनेट, औजारे बँक, आणि बीज प्रक्रिया शेड, आदी बाबतीत आहे. तर काही कृषी सहाय्यकांनी दुसऱ्यांच्या नावावर स्वतःचे दुकान थाटून योजनेतील विविध साहित्यांची बोगस देयके जोडून अर्धे तुम्ही अर्धे आम्ही या तत्वावर अनेक शेतकऱ्यांना लुटले असल्याची पुराव्यानिशी माहिती तक्रारदार यांनी संघटनेकडे दिली आहे. वाशिम जिल्ह्यातील हा घोटाळा धक्कादायक असून शासन राबवित असलेल्या शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना कृषी अधिकारी, कर्मचारी आणि दलाल फस्त करीत आहेत.

परिणामी पात्र लाभार्थी शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत. ही एक गंभीर बाब असून या घोटाळ्याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी विधान भवनासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा प्रदेश उपाध्यक्ष गौरीशंकर मुळे यांनी एका पत्रकाद्वारे दिला आहे.




## रात्रीच्या अंधारात अवैध उत्खनन सुरू...

# महसूल अधिकारी संशयाच्या घेऱ्यात !

**• दिपक मापारी @ रिसोड •**

खानापूर परिसरात रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेत मोठ्या प्रमाणावर अवैध मुरुम उत्खनन व वाहतूक सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.विशेष म्हणजे,याकडे महसूल विभागाचे माहिती दिल्यानंतरही कमालीचे दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.खानापूर हे गाव सध्या 'गौण खनिजांचे गाव' म्हणून ओळखले जाऊ लागले असून,येथे तहसील प्रशासनामार्फत तालुक्यात बाहेरील मुर्तीजापुर येथील ठेकेदाराला उत्खननाची



परवानगी देण्यात आली आहे.मात्र ही परवानगी फक्त दिवसा उत्खनन व वाहतूक करण्यापुरती मर्यादित असताना,संबंधित ठेकेदार रात्री उशिरापर्यंत उत्खनन व वाहतूक करत असल्याचे स्पष्ट पुरावे समोर आले आहेत.रात्रीच्या काळोखात जेसीबी व

### खानापूर परिसरात गौण खनिजांची खुलेआम लूट

टिप्परचा धुमाकूळ परवानगीचा भंग करत रात्रीच्या वेळेस जेसीबी आणि तीन टिप्परच्या सहाय्याने मुरुमाची मोठ्या प्रमाणावर चोरी सुरू असल्याचे फोटो व पुरावे उपलब्ध झाले आहेत.याबाबतची माहिती महसूल प्रशासनाला तसेच संबंधित तलाठ्यांनाही देण्यात आली असतांना देखील प्रत्यक्ष कारवाईचा अभाव हा अनेक प्रश्न उपस्थित करणारा ठरत आहे.ज्या ठिकाणी उत्खननाची



परवानगी देण्यात आली आहे,त्या ठिकाणी परवानगीपेक्षा कितीतरी पटीने अधिक खोदकाम करण्यात आले आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ पाहणी करून संबंधित उत्खनन स्थळाचे तांत्रिक मोजमाप करून खनिजांची वाहतूक तात्काळ थांबवावी,तसेच रात्रीच्या वेळेस अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या जेसीबी व तीन टिप्परवर जप्तीची कारवाई करण्यात यावी.या संबंधी अंकुश कडू यांनी तहसील कार्यालय येथे तक्रार दिली आहे.

नियम मोडणाऱ्यांना संरक्षण कोणाचे?आणि महसूल विभाग नेमका कोणाच्या बाजूने उभा आहे. ही बाब केवळ खानापूर पर्यंत मर्यादित न राहता,संपूर्ण तालुक्यातील गौण खनिज घोटाळ्याचे संकेत देणारी ठरत असून,आता प्रशासन खरोखर कारवाई करणार की पुन्हा डोळेझाक करणार,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जिल्हा परिषद वाशिम चा आवक जावक विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर !

### मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम

**• दिपक मापारी @ रिसोड •**

रिसोड जिल्हा परिषद आवक-जावक विभागामध्ये २ जाने २६ रोजी दिलेले निवेदन गहाळ झाले त्या बाबत् आज माननीय जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन दोषीवर कारवाई करण्याची मागणी

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांच्या नावाने २/१/२०२६ रोजी कार्यालयाच्या आवक-जावक विभागामध्ये निवेदन सादर केलं होतं त्या निवेदनामध्ये पंचायत समिती वाशिम व रिसोड नरेगाच्या कामाची चौकशीची मागणी होती हे निवेदन देऊन वीस दिवस झाले तरी त्याच्यावर कारवाई झाली नाही ज्या संबंधित आवक-जावक विभागाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी संगनमताने निवेदन गहाळ केले आहे. जाणून भुजून ते निवेदन घायाळ केलं त्या कर्मचारी व अधिकारी सखोल चौकशी करून अधिकाऱ्याला निलंबित करा तथा पंचायत समिती वाशिम रिसोड यांच्यावर एक समिती नेमून रोजगार हमी योजनेची सखोल चौकशी करण्यात यावी कथा कारवाई करणार यावी ही नम्र विनंती अन्यथा जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या समोरील व जिल्हा परिषदेच्या समोरील टॉवरवर चढून आत्महत्या करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# 88 नगरसेवकांच्या मानधनावर दरमहा 1 कोटी खर्च

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला :** नुकत्याच संपन्न झालेल्या अकोला महापालिका निवडणुकीत नव्याने ८० नगरसेवक निवडून आले. त्यांच्या मानधनामुळे आता महानगरपालिकेच्या तिजोरीवर वार्षिक ९९ लाख ८४ हजार रुपयांचा बोजा पडणार आहे. या व्यतिरिक्त मासिक सर्वसाधारण सभेसाठी भत्ते म्हणून दरवर्षी अतिरिक्त लाखो रुपये खर्च केले जातील. यासंदर्भात ८० निवडून आलेले नगरसेवक आणि आठ नामनिर्देशित नगरसेवक असलेल्या अकोला महापालिकेत एकूण ८८ नगरसेवक राहतील. नगरसेवकांना त्यांच्या श्रेणीनुसार मानधन दिले जाते. मुंबई महानगरपालिका अ प्लस श्रेणी मध्ये आहे. जिथे नगरसेवकांना मासिक पंचवीस हजार रुपये मानधन मिळते. अकोला महानगरपालिका

## ♦ भत्ते आणि वाहनांचा खर्च वेगळा



ड श्रेणी मध्ये आहे जिथे नगरसेवकांना दरमहा चार बैठकांसह दहा हजार चारशे रुपये मानधन मिळेल. अकोला महापालिकेत ८० नगरसेवक निवडून आले आहेत. आणि आठ नामनिर्देशित नगरसेवक निवडून येतील या ८८ नगरसेवकांना दरमहा दहा हजार चारशे रुपये मानधन दिले जाईल. म्हणजे महिन्याला एकूण ९ लाख १५ हजार दोनशे रुपये दिले जातील. तर बारा महिन्यात एक करोड नऊ लाख ८२ हजार ४०० रुपये दिले जातील. दरम्यान आठ मार्च २०२२ पासून तीन वर्ष सात महिने महापालिकेत प्रशासक राज होते त्यामुळे अकोला महानगरपालिकेने नगरसेवकांच्या मानधनापोटी दिली जाणारी तीन कोटी ३५ लाख रुपयाहून जास्तीची रक्कम वाचवली आहे. त्यामुळे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे पगार सुरळीत सुरू होते परंतु आता नगरसेवकांच्या मानधनाचा खर्च अधिक नवीन पदाधिकाऱ्यांच्या वाहनांसाठी होणारा खर्च वाढणार आहे चार वर्षांपासून निवडणुका नसल्याने काही जुनी वाहने निरुपयोगी झाले आहेत महापौरांचे वाहन आयुक्त आणि इतर अधिकारी वापरत आहे परिणामी आता परत काही गाड्या महापालिकेला घ्यावे लागतील त्यामुळे नवीन पदाधिकाऱ्यांचे लाड पुरवताना महापालिका प्रशासनाच्या नाकीनऊ येतील.

# अकोल्यात सिध्दीविनायक गणेश मंदिरात भक्तिरसाचा महापूर

प्रतिनिधी २२ जानेवारी

### ३००० विद्यार्थ्यांनी केले 'एक लक्ष' वेळा अथर्वशीर्ष पठण
### भक्ती आणि शिस्तीचा संगम, परिसरात नवचैतन्यांचे वातावरण



**अकोला :** शहरातील ज्योती नगर येथील श्री सिद्धिविनायक गणेश मंदिर परिसरात आज 'गणेश जयंती' निमित्त एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक धार्मिक सोहळा पार पडला. अकोल्यात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या 'एक लक्ष वेळा अथर्वशीर्ष पठण' कार्यक्रमात ३००० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध केला.

आज सकाळी अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाला सुरुवात झाली. या सोहळ्यात शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत हजेरी लावली होती. एका सुरात आणि लयबद्ध पद्धतीने सुरू असलेल्या अथर्वशीर्ष पठणामुळे परिसरात दैवी ऊर्जेचा संचार झाला होता. ३००० विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे केलेल्या या पठणामुळे 'एक लक्ष' आवर्तनांचा संकल्प यशस्वीरित्या पूर्ण झाला. गणेश जयंतीचे औचित्य साधून भगवान श्री गणेशाचा भव्य जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मूर्तीला अभिषेक करण्यात आला, तसेच सामूहिक आरती, भजन आणि हवनाचे आयोजन करण्यात आले होते. 'आजच्या धकाधकीच्या जीवनात तरुण पिढीला संस्कार आणि आध्यात्मिक शांतता मिळावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे,' असे मत आयोजकांनी व्यक्त केले. हा महासोहळा यशस्वी करण्यासाठी अकोल्यातील तीन प्रमुख संस्थांनी एकत्र येत परिश्रम घेतले. यात भारत शिक्षण प्रसारक मंडळ, सिद्धिविनायक मंदिर संस्थान, ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प तसेच निलेश देव मित्र मंडळाने याचे आयोजन केले होते. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी अकोला शहरासह जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. अकोल्याच्या सांस्कृतिक आणि धार्मिक वैभवात भर टाकणारा हा सोहळा दीर्घकाळ स्मरणात राहील, अशा प्रतिक्रिया नागरिकांनी दिल्या.

# प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य सोहळ्याची जय्यत तयारी

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला :** शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या लालबहादूर शास्त्री स्टेडियमवर भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य सोहळ्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. अकोला जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्टेडियम परिसराची रंगरंगोटी व स्वच्छता युद्धपातळीवर करण्यात येत आहे.






मुख्य सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अकोला पोलीस दलाकडून परेडची कडक सराव (कवायत) सुरू असून, शिस्तबद्ध संचलनासाठी विशेष तयारी केली जात आहे. यासोबतच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर साकारण्यात आलेल्या देशाच्या जवानांच्या प्रतिमांचीही प्रशासनाच्या वतीने स्वच्छता व देखभाल करण्यात आली आहे. प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावा, यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग तसेच संबंधित यंत्रणा सज्ज झाल्या असून नागरिकांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे.

# शेत रस्त्याच्या मागणीसाठी वृद्ध दाम्पत्याचे उपोषण

प्रतिनिधी २२ जानेवारी

**खामगाव :** शेतरस्त्याच्या मागणीसाठी तालुक्यातील लांजूळ येथील वृद्ध दाम्पत्याने २१ जानेवारीपासून येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.



श्रीराम पुंजाजी शिंदे (७३) यांचे लांजूळ शिवारात शेती असून, त्या शेताला अद्याप रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे कुटुंबीयांची मोठी गैरसोय होत आहे. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित प्रकरणात त्यांची कागदपत्रे ग्राह्य न धरता त्यांच्या विरोधात आदेश पारित करण्यात आले आहेत. या शेतरस्ता प्रकरणातील उपविभागीय अधिकारी यांच्या निर्णयावर उच्चस्तरीय वृद्धावस्थेतही न्याय मिळावा, शेताला रस्ता उपलब्ध व्हावा आणि अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रश्नावर तोडगा निघावा, यासाठी उपोषणाचा मार्ग स्वीकारल्याचे शिंदे दाम्पत्याने सांगितले. प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न आहे. फेरविचार समिती नेमण्यात यावी, दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच लांजूळ येथील शेताला कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांसाठी श्रीराम पुंजाजी शिंदे व त्यांच्या पत्नी विमल श्रीराम शिंदे (६५) हे वृद्ध दाम्पत्य उपोषणाला बसले आहेत.

# शरद तुरकर हल्ला प्रकरणी पाच आरोपींची न्यायालय कोठडीत रवानगी

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला :** नगर सेवक शरद तुरकर यांच्यावर हल्ला करणाऱ्या ५ फरार आरोपींना अकोट फाईल पोलिसांनी अटक केली. पाचही आरोपींना न्यायालयात सादर केले. न्यायाधीशांनी आरोपींची न्यायालय कोठडीत रवानगी केली. फरार आरोपींचा शोध पोलिस घेत होते.



गुन्हा दाखल झाल्यानंतर सर्व आरोपी फरार झाले होते. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या सुचनांचे पालन करून अकोट फाईलचा निरीक्षक शेख रहीम यांच्या नेतृत्वाखाली फरार आरोपी नितीन नरेश राउत, रा. हनुमान चौक, अकोट फाईल, शेख सोहेल शेख चांद रा. साधना चौक, आकाश विनोद पवार मलकापुर जि. बुलढाणा, लखन इंगळे रा. अण्णा भाऊ साठे चौक, सुरज पोचन्न मुद्दलवार रा रेल्वे क्वार्टर जठारपेठ अकोला यांना ताब्यात घेतले. आरोपींची जिल्हा कारागृहात रवानगी केली.

# रेतीची अवैध वाहतूक करणारा टिप्पर जप्त

प्रतिनिधी २२ जानेवारी

**खामगाव :** रेतीची अवैध वाहतूक करणारा टिप्पर उपविभागीय अधिकाऱ्यांच्या पथकाने पकडला. बुधवारी दुपारी जलंब रेल्वेगेट परिसरात ही कारवाई करण्यात आली. हा टिप्पर जलंब पोलिस ठाण्यात जमा करण्यात आला आहे.

खामगाव येथील उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी हे २१ जानेवारी रोजी शासकीय कामानिमित्त कठोरा येथे जात असताना जलंब रेल्वेगेटजवळ संशयास्पदरीत्या रेतीची वाहतूक करणारा टिप्पर त्यांच्या निदर्शनास आला. त्यांनी तत्काळ वाहन थांबवून टिप्पर चालकाकडे रेती वाहतुकीची रॉयल्टीबाबत चौकशी केली. चालकाकडे रॉयल्टी नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कारवाई करण्यात आली. डॉ. रामेश्वर पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या संबंधित टिप्पर ताब्यात घेऊन जलंब पोलिस ठाण्यात जमा केला.

# कारमधून गुटख्याची वाहतूक ; 7.34 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २२ जानेवारी

**खामगाव :** कारमधून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी दुपारी पारखेड फाट्यानजीक कारवाई करून गुटखा वाहतूक करणारी एक कार ताब्यात घेतली. या कारमधून गुटख्यासह सुमारे ७ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, चालकासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाने पारखेड फाटा येथे नाकाबंदी केली होती. यावेळी मलकापूरकडून खामगावकडे येणारी कार (क्रमांक एमएच २८ बीक्यू ६५७० ) थांबवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान कारमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा आढळून आला. या कारवाईत पोलिसांनी ५ लाख ३४ हजार ८० रुपयांचा गुटखा, तसेच ५ लाख रुपये किंमतीची कार, असा एकूण ७लाख ३४ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी कार चालक दिनेश मनवरलाल नथ्थाणी (४२, रा. सिंधी कॉलनी, झुलेलालनगर, खामगाव) व त्याच्यासोबत असलेला तेजस दीपक जैन (४३, रा. अनिकट रोड, खामगाव) या दोघांविरुद्ध अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे यांच्या फिर्यादीवरून खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक निलेश तांबे व अपर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या आदेशानुसार करण्यात आली. या कारवाईत एएसआय सुनील राऊत, सुधाकर थोरात, योगेश कुंवारे, विनोद तायडे व विशाल कोळी यांनी सहभाग घेतला.


## लिनेस क्लब ऑफ अकोला

# राजश्री समनपुरे जयस्वाल यांच्या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला :** अत्यंत उल्हासित वातावरणात लिनेस क्लब ऑफ अकोलाच्या वर्ष २०२६ च्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण समारोह संपन्न झाला. या वर्षाचे क्लबचे ब्रीदवाक्य आहे - 'एक साथ एक लक्ष्य, उज्ज्वल समाजाचे निर्माण.' या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोज करण्यात येईल. लिनेस क्लब ऑफ अकोलाच्या सन २०२६ च्या क्लब अध्यक्षा पदावर लि. राजेश्री समनपुरे ( जयस्वाल), सचिव लि. वनिता बिजवे, कोषाध्यक्षा लि. अलका उमाळे यांनी उत्साहात पदग्रहण केले आहे. नवनिर्वाचित प्रांताध्यक्षा लि. कल्पनाजी देशमुख यांनी अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व कार्यकारिणी मंडळाला शपथ दिली. माजी प्रांताध्यक्षा लि. स्वातीजी झुनझुनवाला यांच्या हस्ते नवीन सदस्यांचा शपथविधी सोहळा पार पडला. नवनिर्वाचित क्लब प्रांताध्यक्षा लि. कल्पनाजी देशमुख आणि इतर सर्व माजी प्रांताध्यक्षा लि. हरविंदर कौरजी





सेठी, लि. उषाजी बाहेती, लि. डॉ. ताराजी माहेश्वरी, लि. आशाजी विरवाणी, लि. सुनंदाजी गुप्ता व लि. स्वातीजी झुनझुनवाला यांचे टिळा लावून आणि पुष्पहार अर्पण करून मंगलमय वातावरणात जोरदार स्वागत करण्यात आले. या प्रसंगी क्लबतर्फे तीळगुळ पदार्थ, संक्रांती थीमवर रांगोळी, लकी ड्रॉ आणि 'ब्लॅक ड्रेस कोड' अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तीळगुळ पदार्थ स्पर्धेत लि. सुलेखाजी गुप्ता, लि. प्रेमजी मुंदडा, लि. जयश्री भारती, लि. रेखाजी शर्मा यांनी यश संपादीत केले. रांगोळी स्पर्धेत लि. रेखाजी शर्मा यांनी बाजी मारली. ब्लॅक ड्रेस कोड लि. रत्नमाला रुईकर आणि श्रद्धाजी जोशी या विजयी झाल्या. कार्यक्रमात दोन सेवाभावी प्रकल्प राबविण्यात आले, ज्यामध्ये लि. आशाजी पटेल यांच्यातर्फे २ ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. १५ जानेवारी 'भारतीय सैन्य दिना'चे औचित्य साधून राजेश्री समनपुरे यांच्या हस्ते दोन सैनिक कुटुंबांचा सन्मान करण्यात आला. तसेच अकोला शहरातील प्रतिष्ठित 'एकता ज्वेलर्स'च्या व्यवस्थापकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी क्लबसाठी ६ लकी ड्रॉ भेटवस्तू दिल्या होत्या. स्पर्धेच्या परीक्षणाची जबाबदारी लि. इंद्राणी देशमुख आणि लि. राजेश्री देशमुख यांनी सांभाळली. क्लबच्या वार्षिक शुल्काची जबाबदारी लि. सुलेखाजी गुप्ता व लि. उमा बाजोरिया यांनी चोख पार पाडली. मकर संक्रांतीनिमित्त क्लबतर्फे हळदी-कुंकू व वाण वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम विशेषतः बहारदार करण्यासाठी सहसचिव नूपुर समनपुरे (जयस्वाल) यांचा मोलाचा सहभाग लाभला. शेवटी क्लब सचिव लि. वनिता बिजवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि कोषाध्यक्षा लि. अलका उमाळे यांनी वार्षिक बजेट सादर करून आभार प्रदर्शन केले.माजी अध्यक्षा लि. इंदुमतीजी मोहता यांनी नवीन कार्यकारिणीचे अभिनंदन केले. अत्यंत संगीतमय आणि दिमाखदार पद्धतीने लि. रत्नमालाजी रुईकर व लि. चंदाजी जायसवाल यांनी सूत्रसंचालनाचे कार्य उत्कृष्टरित्या पार पाडून कार्यक्रमाची शोभा वाढवली. ध्वज वंदना लि. आशाजी पटेल यांनी केली, तर स्वागत गीत लि. रचनाजी खंडेलवाल यांनी सादर केले.



# वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवाचा उत्साहात शुभारंभ

प्रतिनिधी २२ जानेवारी

**अकोला :** सांस्कृतिक कार्य विभागातर्फे वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवाचा शुभारंभ प्रमिलाताई ओक सभागृहात झाला. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी साखरवीरा येथील कलावंतांच्या बंजारा नृत्यकलेच्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

## ♦ बंजारा नृत्यकलेने केले उपस्थितांना मंत्रमुग्ध




ज्येष्ठ रंगकर्मी मधू जाधव, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, बबनराव कानकिरड, रंगकर्मी विष्णू निंबाळकर, कलावंत ललिता जाधव, रत्नपारखी, सचिन गिरी, महेश इंगळे, रोशन समदुरे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलनाने महोत्सवाचा शुभारंभ झाला.

लोककला हे सर्व कलांचे मूळ आहे. लोककलांचे संवर्धन करण्यासाठी सर्व स्तरांतून प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जाधव यांनी यावेळी केले. बार्शिटाकळी तालुक्यातील साखरवीरा येथील ललिता जाधव व सहकारी कलावंतांनी बंजारा नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. पुढील सत्रात महाराष्ट्राची लोककला, वासुदेव, गोंधळ, भारुड कलापथक खडी गंमत आदी सादरीकरण होणार आहे. पातूर येथील शाहीर विशाल राखोंडे व लोककवी सागर राखोंडे संच, साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु. मंडळ व स्व. विनायक राखोंडे प्रतिष्ठान आदींचे १५ कलावंत कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनात, तसेच सांस्कृतिक संचालक विभीषण चवरे यांच्या नियोजनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. अकोलेकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

CLASSIFIED

अकोल्यात आता नव्याने सुरू
द पाटील फ्रुड सेंटर चायनिज
येथे तुम्हाला सर्व प्रकारचे चायनिज, नुडल्स, मनचुरियन्स राईस लालीपॅप मिळेल.
वेळः सायंकाळ ४ ते रात्री ११ वार्जपर्यंत
होमडिलीवर उपलब्ध आणि प्राईज फक्त ७० रुपयापासून सुरू, मग सर्वांनीच एकदा जाऊन आनंद घ्या!
-ः आमचा पत्ता ः-
पाटील फ्रुड सेंटर
बारा जोतिलिंग रोड जवळ करोटे ज्वेलर्स
जठारपेठ चौक, अकोला
प्रतिक हिंगणकर
Mo. 7378444488

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK